RNI No. - MAHMAR 2023/84526

# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com

❑ वर्ष - १ ❑ अंक -२५७ ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ शनिवार दि.१६ डिसेंबर २०२३ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६

## लोकसभेसह विधानसभेच्या निवडणुकाही महायुतीतील तीनही पक्ष एकत्रित लढवणार : देवेंद्र फडणवीस

### विजय आपलाच होणार असला तरी गाफील राहू नका, असा कानमंत्रही पदाधिकाऱ्यांना दिला

**दि.१६विदर्भ प्रजासत्ताक नागपूर**

आगामी लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भाजपाच्या पदाधिकाऱ्यांची महत्त्वपूर्ण बैठक नागपुरातील कोराडी येथे पार पडली. या बैठकीत पदाधिकाऱ्यांना मार्गदर्शन करताना देवेंद्र फडणवीस यांनी आपण लोकसभेसह विधानसभेच्या निवडणुकाही महायुतीतील तीनही पक्ष एकत्रित लढवणार आहोत, अशी घोषणा केली. तसंच आपला विजय होणार असला तरी गाफील राहू नका, असा कानमंत्रही पदाधिकाऱ्यांना दिला आहे.

पदाधिकाऱ्यांना मार्गदर्शन करताना फडणवीस म्हणाले की, महाविजय २०२४ हे अभियान आपण सुरू केलं आहे. या अभियानाच्या दृष्टीने आपण खालपर्यंत संघटनेची रचना तयार केली आहे. विजयाची भावना घेऊन आपल्याला मैदानात उतरायचं आहे, मात्र कोणीही अतिआत्मविश्वास ठेवता कामा नये. त्यामुळे लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीमुळे पुढील ९ ते १० महिने आपल्याला पक्षासाठी द्यायचे आहेत. तीनही



पक्ष दोन्ही निवडणुका एकत्र लढवणार आहेत. तुमच्या मनात असतील तितक्या जागा आपल्याला मिळणारच आहे, त्यामुळे तुम्ही ती चिंता करू नका, असा विश्वास फडणवीस यांनी कार्यकर्त्यांना दिला.

#### पदाधिकाऱ्यांना आवाहन

विकसित भारत यात्रा सुरू झाली आहे. ही यात्रा खऱ्या अर्थाने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना लोकांशी जोडणारी यात्रा आहे. हा फक्त संकल्प यात्रेचा रथ नसून नरेंद्र मोदी यांच्या गॅरंटीचा रथ आहे. जी गॅरंटी लोकांपर्यंत पोहोचत आहे, जी गॅरंटी फक्त शब्दांपुरती मर्यादित नाही. त्यामुळे ही यात्रा लोकांपर्यंत पोहोचवणं, केंद्र सरकारच्या योजना लाभार्थ्यांपर्यंत पोहोचवणं, ही यात्रा ज्या भागात जात आहे, तिथं योग्य पद्धतीने स्वागत होत आहे का, लोक उपस्थित राहात आहेत का, हे पाहणं भाजपाच्या कार्यकर्त्यांचं काम आहे. त्यामुळे तुम्ही ते लक्षपूर्वक केलं पाहिजे, असं आवाहन फडणवीस यांनी पदाधिकाऱ्यांना केलं.

#### महाराष्ट्राला मोदींचं आकर्षण

महाराष्ट्रातील सर्वसामान्य माणसांना नरेंद्र मोदींचं आकर्षण आहे. अनेकदा असं सांगितलं जातं की मोदींचं आकर्षण फक्त हिंदी भाषिक राज्यातील लोकांना आहे. मात्र हे खोटं आहे. महाराष्ट्रातील जनतेला मोदींचं आकर्षण नसतं तर लोकसभेच्या दोन निवडणुकांमध्ये आपण ४२ जागा जिंकू शकलो नसतो. यातील काही अशा जागा आपण जिंकल्या की ज्यांचा आपण कधी विचारही केला नव्हता, असंही फडणवीसांनी म्हटलं आहे. दरम्यान, राहुल गांधी हे विरोधक म्हणून आपल्याला मिळालेलं वरदान आहे, असा टोला देवेंद्र फडणवीस यांनी काँग्रेसला लगावला आहे.

## बेरोजगारी अन् महागाई हेच संसद घुसखोरीचे मुख्य कारण; राहुल गांधींची केंद्रावर टीका

**दि. १६विदर्भ प्रजासत्ताक नवी दिल्ली**

संसदेत घुसखोरी प्रकरणी विरोधक चांगलेच आक्रमक झाले आहेत. दोन दिवसांपासून संसदेतील गोंधळ कायम आहे. गृहमंत्री



अमित शाह यांनी १३ डिसेंबरच्या घटनेवर सभागृहात उत्तर द्यावे, अशी मागणी विरोधकांकडून होत आहे. मात्र, सरकारकडून सभागृहात कोणतेही निवेदन देण्यात आलेले नाही. गृहमंत्री शाह सभागृहात येऊन संपूर्ण घटनेवर निवेदन करत नाहीत, तोपर्यंत सभागृहाचे कामकाज चालू शकणार नाही, असे काँग्रेसने म्हटले आहे. संसद घुसखोरी प्रकरणी काँग्रेस नेते आणि खासदार राहुल गांधी यांनी थेट शब्दांत भाष्य केले.

असे का घडले? मुख्य मुद्दा बेरोजगारी आहे. बेरोजगारीचा मुद्दा संपूर्ण देशभरात आहे. पंतप्रधान मोदींच्या धोरणांमुळे देशातील तरुणांना रोजगार मिळत नाही. संसदेत घुसखोरी होण्याची घटना झाली, त्यामागे बेरोजगारी आणि महागाई हेच कारण आहे, अशी टीका राहुल गांधी यांनी केली.

## आता अमरावतीत दिवसातून पाच वेळा हनुमान चालिसा पठण होणार

### नवनीत राणांचे उद्धव ठाकरेंना खुले आव्हान

**दि.१६विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

हनुमान चालिसा पठणावरून शिवसेना पक्ष प्रमुख उद्धव ठाकरे आणि अमरावती लोकसभा मतदार संघाच्या अपक्ष आमदार नवनीत राणा यांच्यात सुरू झालेले राजकीय वैर अद्यापही संपलेले दिसत नाही. खासदार राणा यांनी याच मुद्द्यावरून पुन्हा एकदा उद्धव ठाकरे यांच्यावर निशाणा साधला आहे.

युवा स्वाभिमान पक्षाचे नेते तथा बडनेरा विधानसभा मतदार संघाचे आमदार रवी राणा व त्यांच्या पत्नी खासदार नवनीत राणा यांच्या पुढाकारातून अमरावती शहरातील हनुमान गढी येथे पाच दिवसीय शिवमहापुराण कथेचे आयोजन करण्यात आले आहे. या कथेच्या निमित्ताने आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमादरम्यान खासदार राणा यांनी पुन्हा एकदा ठाकरे यांच्यावर टीका केली.

मुंबईत 'मातोश्री' बाहेर हनुमान चालिसा पठण करण्यासाठी गेलेल्या राणा दाम्पत्याला पोलिसांनी अटक





केली होती. त्यानंतर सुमारे१४ दिवसांपर्यंत राणा तुरुंगात होते. तरुंगातून बाहेर पडल्यानंतर खासदार राणा यांना रडू कोसळले. पती आमदार रवी राणा यांना घट्ट मिठी मारत त्यांनी आपल्या अश्रूंना वाट मोकळी करून दिली होती. तेव्हापासून जेव्हा जेव्हा संधी मिळेल तेव्हा तेव्हा खासदार नवनीत राणा या उद्धव ठाकरे यांचा समाचार घेतात. यंदा शिवमहापुराण कथा या आध्यात्मिक आयोजनाच्या व्यासपीठावरून राणा यांनी ठाकरेंवर टीका केली.

भानखेडा येथील हनुमान गढी परिसरात कथाकार प्रदीप मिश्रा हे शिवमहापुराण सांगणार आहे. तत्पूर्वी काढलेल्या कलश यात्रेच्या निमित्ताने बोलताना खासदार राणा म्हणाल्या की, हनुमान चालिसा पठण केली म्हणून आम्हाला तुरुंगात टाकण्यात आले. तेव्हाच आम्ही अमरावतीच्या हनुमान गढी येथे १११ फुटाच्या हनुमान मूर्तीची उभारणी करण्याचा निर्णय घेतला. आता अयोध्येतील पवित्र गढीवरून आणलेली माती अमरावतीच्या हनुमान गढीची शोभा वाढवत आहे.

आम्ही एकदा हनुमान चालिसा पठण केले म्हूून आम्हाला जेलमध्ये टाकण्यात आले होते. आता अमरावतीत दिवसातून पाच वेळा हनुमान चालिसा पठण होणार आहे. उद्धव ठाकरे यांनी आम्हाला त्यावेळी हनुमान चालिसा पठण करण्यापासून रोखले होते. आता त्यांच्यात हिंमत असेल तर त्यांनी अमरावतीमधील हनुमान गढीत दिवसातून पाच वेळा करण्यात येणारे हनुमान चालिसा पठण रोखून दाखवावे, असे आव्हानही खासदार राणा यांनी दिले.

शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्यावर केलेल्या टीकेतून खासदार राणा यांनी लोकसभा निवडणुकीसाठी रणशिंग फुंकल्याचं सांगण्यात येते. अलीकडेच राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष तथा उपमुख्यमंत्री अजित पवार अमरावतीत येऊन गेलेत. त्यावेळी खासदार राणा या त्यांच्या स्वागतासाठी गेल्या होत्या. यापूर्वीची लोकसभा निवडणूक राणा यांनी अपक्ष उमदेवार म्हणून लढविली असली तरी त्यांना राष्ट्रवादी काँग्रेसनं पाठिंबा दिला होता. आता राणा दाम्पत्य भाजपच्या संपर्कात आहे. राणा दाम्पत्य 'राज्यात देवेंद्र तर केंद्रात नरेंद्र' हा मंत्र सातत्याने जपत असतात. त्यामुळं यंदाची लोकसभा निवडणूक राणा या भाजपच्या पाठिंब्यानं लढतील अशी शक्यता वर्तवण्यात येत आहे.

## तुमच्यावर शरद पवारांचा दबाव होता का? आशिष शेलारांचा संजय राऊतांना थेट सवाल

**दि.१६विदर्भ प्रजासत्ताक नागपूर ३०**

धारावी पुनर्विकास प्रकल्पावरून शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाने आक्रमक भूमिका घेत अदानी ग्रुपच्या कार्यालयावर मोर्चा काढण्याचा निर्णय घेतला. धारावी पुनर्विकास प्रकल्पावरून ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी सत्ताधाऱ्यांवर जोरदार टीका केली. याला भाजप नेते आणि आमदार आशिष शेलार यांनी प्रत्युत्तर दिले.

अडवणूक आंदोलन कधी मोर्चा, मुंबईत उबाठाबाबत एकच चर्चा, धारावीतून निकालेंगे मातोश्री टू का खर्चा, अशी खोचक टीका आशिष शेलार यांनी पत्रकारांशी संवाद साधताना केली. धारावीतून निघणारा ठाकरे गटाचा मोर्चा होऊ नये. तो थांबावा, यासाठी दिल्लीतून दबाव आहे, असा दावा संजय राऊत यांनी केला होता. याबाबत आशिष शेलार यांना प्रश्न विचारण्यात आला. यावर, तुमच्यावर कोणाचा दबाव होता मग? तुमच्यावर शरद पवारांचा दबाव होता का? पवारांनी दिल्लीतून फोन केला होता का? असा



प्रतिप्रश्न आशिष शेलार यांनी केला.

**टीडीआर घोटाळा असेल तर सर्वस्वी पाप उद्धव ठाकरेंचे आहे**

धारावी पुनर्विकास प्रकल्प हा देशातील सर्वांत मोठा टीडीआर घोटाळा होताना आम्हाला दिसतोय, असा आरोप संजय राऊतांनी केला होता. यावर बोलताना, या टेंडरच्या अटी, कार्यपद्धतीचे आणि त्याबाबतीतील धोरणात्मक निर्णय उद्धव ठाकरेंच्याच काळात झाले आहेत. टेंडरमध्ये गडबड असेल, टीडीआर घोटाळा असेल तर सर्वस्वी पाप उद्धव ठाकरे यांचेच आहे. ५०० फुटांची घरे हवी होती मग उद्धव मुख्यमंत्री होतात तेव्हा टेंडरमध्ये अट घालायची होती. तेव्हा का नाही घातली? आज तुम्हाला उपरती का झाली? अशी विचारणा आशिष शेलार यांनी केली.

दरम्यान, मुंबईला आणि राज्याला काही विकासातून मिळाले की ज्यांची पोटदुखी होते ते म्हणजे उबाठा. त्यामुळे त्यांच्या पोटदुखीचा हा कार्यक्रम आहे. गांजा, ड्रग्जबाबत संजय राऊत यांनी केलेल्या आरोपात काही तथ्य नाही, अशी टीका आशिष शेलार यांनी केली. तत्पूर्वी, धारावी पुनर्विकास प्रकल्प हा देशातील सर्वांत मोठा टीडीआर घोटाळा होताना आम्हाला दिसतोय. धारावी पुनर्विकास प्रकल्प हा या देशातील टीडीआर प्रकल्प आहे. धारावी वाचवा म्हणजे मुंबई वाचवा. धारावी हा पहिला घास आहे आणि त्यानंतर मुंबई गिळण्याचे गुजराती लॉबीचे फार मोठे कारस्थान आहे. गुजरात मॉडेल जबरदस्त पद्धतीने पुढे जात आहे, या शब्दांत संजय राऊत यांनी टीका केली होती.

## दिशा सालियन प्रकरणी एसआयटी, आदित्य ठाकरेंची चौकशी; राऊतांची रोखठोक प्रतिक्रिया

**दि.१६विदर्भ प्रजासत्ताक मुंबई**

दिशा सॅलियन मृत्यूप्रकरणी आदित्य यांची एसआयटी चौकशी केली जाणार असल्याची चर्चा आहे. त्यासाठी राज्यातील महायुती सरकारने एसआयटी स्थापन केली आहे. त्यावरुन, आता शिवसेना ठाकरे गट आक्रमक होताना दिसून येत आहे. शिवसेना खासदार संजय राऊत यांना याप्रकरणी प्रश्न विचारण्यात आला होता. त्यावर, त्यांनी विद्यमान सरकारकमधील दोन मंत्र्यांच्या चौकशीची मागणी केली आहे. दरम्यान, या चौकशीप्रकरणी आदित्य ठाकरेंनीही महायुती सरकारवर निशाणा साधला.



दिशा सालियन मृत्यूप्रकरणाचा तपास करण्यासाठी स्थापन करण्यात आलेल्या या एसआयटी समितीमध्ये अपर पोलीस आयुक्त राजीव जैन, उपायुक्त अजय बंसल, वरिष्ठ पोलीस निरीक्षक चिमाजी आढाव यांचा समावेश आहे. याप्रकरणावरून भाजप आमदार नितेश राणेंनी ठाकरेंवर हल्लाबोल केला होता. आदित्य ठाकरे आणि मला समोरासमोर बोलवा, असं आवाहन त्यांनी दिलं आहे. दरम्यान, याप्रकरणी खासदार संजय राऊत यांनी रोखठोक भूमिका मांडली.

सध्या एसआयटींचा पाऊस पडत आहे, यावर एसआयटी, त्यावर एसआयटी म्हणत राऊत यांनी सरकारवर निशाणा साधला. आमच्या सरकारच्या काळात ३ गंभीर विषयांवर आम्ही एसआयटी नेमली होती, ती एसआयटी विद्यमान सरकारने रद्द केली. आयएनएस विक्रांत, नवलानीची एसआयटी होती ती रद्द केली. हे केवळ राजकारण सुरू आहे.

## शेतकऱ्यांची फसवेगिरी करणाऱ्यांवर कठोर कारवाई होणार; कृषीमंत्री मुंडेंची माहिती

**दि. १६विदर्भ प्रजासत्ताक नागपूर**

नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प ही राज्य शासनाची जागतिक बँक अर्थ साहाय्यित अत्यंत महत्त्वाची योजना असून या योजनेच्याद्वारे शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणात लाभ देण्याचे नियोजन शासन करत असताना या योजनेचा गैरफायदा घेऊन कोणी कोणत्याही प्रकारची फसवणूक करून शासनाचे अनुदान लाटण्याचा प्रयत्न करत असेल तर, त्यावर शंभर टक्के कार्यवाही करून चुकीचे अनुदान लाटलेल्यांकडून सक्त वसुली करण्यात येईल, अशी ग्वाही आज विधान परिषदेत बोलताना कृषीमंत्री धनंजय मुंडे यांनी दिली.

अकोला जिल्ह्यात नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प अंतर्गत औजारे व ट्रॅक्टर वाटपाच्या संदर्भात गैरव्यवहार झाल्याची तक्रार विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे, आमदार अमोल मिटकरी आदींनी लक्षवेधीच्या माध्यमातून केली होती, त्याच्या उत्तरादाखल धनंजय मुंडे बोलत होते.

अकोला जिल्ह्यात सदर



योजनेतून ट्रॅक्टर व औजारे खरेदीच्या अनुदानासंदर्भात ज्या तक्रारी आल्या आहेत, त्याचा तपास सखोल पद्धतीने करण्यात येत असून, यातील दोषींवर सक्तवसुलीसह आवश्यकता भासल्यास पोलीस तक्रार देखील करण्यात येईल, असेही धनंजय मुंडे यांनी स्पष्ट केले.नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्पास आता योजनेचे स्वरूप देण्यात येणार असून, आजवर लाखो हेक्टर शेती पाण्याखाली येण्यास तसेच समूह शेतीच्या माध्यमातून उत्पन्न वाढवण्यास ही योजना मार्गदर्शक ठरली आहे. या योजनेचा दुसरा टप्पा लवकरच कार्यान्वित करणार येणार असल्याची माहिती, उपस्थित लक्षवेधीच्या माध्यमातून कृषीमंत्री धनंजय मुंडे यांनी दिली.

दरम्यान, नानाजी कृषी संजीवनी योजनेतंर्गत लाभ घेऊन ग्रामीण भागातील तरुणांनी दूध डेअरी, मधुमाशा पालन, श्रीखंड प्रक्रिया उद्योग असे विविध व्यवसाय सुरू केले. यामुळे गावांमध्ये प्रचंड परिवर्तन होत आहे. परंतु या उद्योगांचे खोटे प्रमाणपत्र वितरणाच्या घटनाही उघडकीस आल्याने या योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी कडवट नियमावली तयार करण्यात यावी, अशी मागणी विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी आज परिषद सभागृहात केली.

## संत गाडगे बाबा सामाजिक कार्य पुरस्कार - २०२३ अमरावती येथील आधार फाऊंडेशनला जाहीर

**दि.१६विदर्भ प्रजसत्ताक अमरावती**

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचा कै. नागोरावजी जयरामजी मेटकर स्मृतिप्रित्यर्थ श्री संत गाडगे बाबांच्या दशसूत्रीत नमूद संदेशाप्रमाणे केलेल्या उल्लेखनीय सामाजिक कार्याबद्दल दिला जाणारा 'श्री संत गाडगे बाबा सामाजिक कार्य पुरस्कार २०२३' जाहीर झाला असून बुधवार, दि. २० डिसेंबर, २०२३ रोजी सकाळी ११.०० वाजता विद्यापीठातील डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख अधिसभा सभागृह येथे कुलगुरू डॉ. प्रमोद येवले यांचे शुभहस्ते पुरस्कार प्रदान करण्यात येईल. पुरस्कार कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. प्रमोद येवले भूषविणार असून कार्यक्रमाला प्र-कुलगुरू डॉ. प्रसाद वाडेगांवकर व दानदात्यांचे प्रतिनिधी डॉ.व्ही.एम. मेटकर यांची प्रामुख्याने उपस्थिती लाभणार आहे.संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्यावतीने स्व.द.ना. उपाख्य बबनराव मेटकर यांचेकडून प्राप्त झालेल्या दाननिधीमधून कै. नागोरावजी जयरामजी मेटकर स्मृतिप्रित्यर्थ 'श्री संत गाडगे बाबा सामाजिक कार्य पुरस्कार - २०२३' यावर्षी अमरावती येथील आधार फाऊंडेशन या सामाजिक संस्थेला घोषित झाला आहे. दहा हजार रुपये रोख, स्मृतिचिन्ह, शाल, श्रीफळ व सन्मानपत्र असे या पुरस्काराचे स्वरुप आहे.तरी पुरस्कार वितरण कार्यक्रमाला संलग्नित महाविद्यालयांतील प्राचार्य, विद्यापीठ प्राधिकारणींचे सदस्य, समाजसेवक, शहरातील गणमान्य नागरिक व विद्यार्थी यांनी मोठए संख्येने ऑनलाईन उपस्थित रहावे, असे आवाहन विद्यापीठाच्यावतीने कुलसचिव डॉ. तुषार देशमुख यांनी केले आहे.

## संपादकीय ......

# लोकशाहीचे मंदिरच असुरक्षित?

एकीकडे सरकार राम मंदिराच्या लोकार्पण सोहळ्याची तयारी करत असताना दुसरीकडे लोकशाहीच्या मंदिरावर अर्थात संसदेत घुसखोरी आणि हुल्लडबाजी होणे ही बाब सुरक्षा व्यवस्थेचे वाभाडे काढणारी आहे. अशा कुचकामी व्यवस्थेचा निषेध करणार्या खासदारांना अध्यक्षांनी चक्क निलंबित करून लोकशाहीची पुन्हा एकदा थट्टा केली आहे, पण बुधवारी झालेल्या घुसखोरीचे फुटेज जे देशभरातील नागरिकांनी पाहिले, ते आता दडवणार कसे, असाही प्रश्न आहे. या घुसखोरीसाठी मुहूर्त बघितला गेला असावा, असा अंदाज वर्तवण्यात येतो. कारण संसदेवर अतिरेक्यांनी केलेल्या हल्ल्यास १३ डिसेंबरला २२ वर्षे पूर्ण झाली. त्याच दिवशी पुन्हा संसदेची सुरक्षा भंग करून हल्ला करण्यात आला.

विशेष म्हणजे या प्रकरणातील आरोपी एका ठिकाणचे रहिवासी नाहीत. लोकसभेत प्रेक्षक गॅलरीतून सभागृहात उडी मारणारा आरोपी सागर शर्मा हा लखनऊचा, तर मनोरंजन हा कर्नाटकातील बंगळुरूचा आहे. तसेच संसदेबाहेर अटक करण्यात आलेली महिला नीलम ही हरियाणाच्या जिंद येथील रहिवासी आहे. २५ वर्षीय अमोल शिंदे हा महाराष्ट्रातील लातूर जिल्ह्यातील रहिवासी आहे. हे चौघेही आरोपी सोशल मीडियाच्या माध्यमातून एक ते दीड वर्षांपासून एकमेकांच्या संपर्कात आले. त्यांनी फेसबुकवर भगतसिंग नावाचा ग्रुपही तयार केला होता. म्हणजेच हल्ल्याचा निर्णय पूर्ण विचाराअंती घेण्यात आला हे स्पष्ट होते.

यापूर्वी १३ डिसेंबर २००१ रोजी संसद भवनावर दहशतवादी हल्ला झाला होता. या हल्ल्याची आठवण करून देणारा व्हिडीओ दहशतवादी पन्नू याने दाखवला आणि असा हल्ला पुन्हा होऊ शकतो अशी धमकी दिली होती. भारतीय गुप्तचर यंत्रणांनी आपल्या हत्येचा कट रचला होता, पण तो अपयशी ठरला. त्याला १३ डिसेंबर रोजी संसद भवनावर हल्ला करून उत्तर देण्यात येईल, अशी धमकी त्याने दिली होती. त्यामुळे बुधवारी झालेल्या हल्ल्याशी पन्नूचे कनेक्शन असावे, असा अंदाज वर्तवण्यात आला. परंतु पोलिसांच्या तपासात मात्र अद्याप असे कोणतेही कनेक्शन नसल्याचेच उघड झाले आहे. त्यामुळे या हल्ल्यामागे काय उद्देश होता ही बाब पुढे आणणे आता अधिक आव्हानात्मक झाले आहे.

मुळात सरकारविषयी जनतेत दिवसेंदिवस जी नाराजी वाढत चालली आहे, त्याची परणीती अशा हल्ल्यातून प्रतीत होते. असे हल्ले समर्थनीय नाहीच, परंतु सरकार आणि कायदा-सुव्यवस्थेविषयी जेव्हा नकारात्मकता निर्माण होते, तेव्हा सर्वसामान्य नागरिक कायदा हाती घेण्यास धजावतो, हे यानिमित्ताने दिसून आले. मला आता कुणी वाली नाही, अशी भावना सामान्यांच्या मनात पक्की रुजते, तेव्हा त्याच्या हातून अघटीत घडू शकते. त्यामुळे सर्वसामान्यांना सुरक्षेची जाणीव करून देणे आणि सरकार आपल्या पाठीशी असल्याचा दिलासा देणे आजच्या घडीला अतिशय महत्वाचे झाले आहे. नवीन संसद भवन सुरू झाल्यावर तर छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याबाहेरच्या प्रवेशद्वारापासून सुरू होणार्या संसद मार्गाचा बराच मोठा भाग, रेडक्रॉस व रायसीना रस्तेही बंद केले गेले, पण रस्ते बंद करून हल्ले रोखता येणार नाहीत. त्यासाठी सुरक्षेची कठोर पावलेच उचलायला हवीत. पूर्वी संसदेत 'वॉच ॲण्ड वॉर्ड' अशी स्वतंत्र यंत्रणा होती. ती प्रामुख्याने लोकसभेबाबत कार्यरत असे. काही वर्षांपूर्वी ती बरखास्त करून एकच संसदीय सुरक्षा यंत्रणा अस्तित्वात आली, मात्र या यंत्रणेतही मनुष्यबळाची मोठी कमतरता जाणवत असल्याचे या कर्मचार्यांचे म्हणणे आहे. नवीन संसदेत कामकाज सुरू झाल्यावर कामाचा ताण दुप्पट वाढला; पण सुरक्षा कर्मचारी आहेत तेवढेच राहिले. सध्याच्या स्थितीत किमान १०० सुरक्षा रक्षक तातडीने नेमण्याबाबतचा प्रस्ताव लोकसभाध्यक्षांकडे गेला. त्यालाही वर्ष झाल्याचे सांगितले जाते.

# लोणार विकास आराखड्यातील कामे 'मिशन मोड'वर पूर्ण करा

## विभागीय आयुक्त डॉ. निधी पाण्डेय



**दि.१६विदर्भ प्रजासत्ताक अमरावती,** लोणार विकास आराखड्यातील कामे कालमर्यादेत पूर्णत्वास जाणे अपेक्षित आहे. त्यामुळे ही कामे 'मिशन मोड'वर पूर्ण करावीत. कामांच्या प्रगतीचा अहवाल वेळोवेळी समितीला सादर करावा, असे निर्देश विभागीय आयुक्त डॉ. निधी पाण्डेय यांनी आज येथे दिले.

लोणार विकास आराखड्यांतर्गत येणाऱ्या विविध विषयांचा आढावा विभागीय आयुक्तांनी बैठकीद्वारे आज विभागीय आयुक्त कार्यालयात घेतला. त्यावेळी त्या बोलत होत्या. बुलडाण्याचे जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील दूरदृश्यप्रणालीव्दारे तसेच मुख्य वनसंरक्षक जयोती बॅनर्जी, समितीचे सदस्य एस सान्याल, दिपक ठाकरे, भारतीय पुरातत्व विभागाचे अधीक्षक अरुण मलीक, विशेष कार्य अधिकारी सुशील आग्रेकर, उपसंचालक (नियोजन) हर्षद चौधरी, विधी अधिकारी नरेंद्र बोहरा, एमएमआरडीएचे अधिकारी, उपविभागीय अधिकारी, मुख्याधिकारी आदी यावेळी उपस्थित होते.

श्रीमती पाण्डेय म्हणाल्या की, बुलडाणा जिल्ह्यातील बेसॉल्ट खडकात उल्कापातामुळे निर्माण झालेले लोणार सरोवर हे जगविख्यात आहे. हे स्थळ जैवविविधतेने सपन्न असून पर्यटनाच्या दृष्टीने महत्वपूर्ण आहे. या पर्यटनस्थळाच्या सर्वांगिण विकासासाठी शासनाव्दारे ३६९ कोटी ७८ लक्ष रुपयांचा विकास आराखडा मंजूर करण्यात आला आहे. विकास आराखड्यातील प्रस्तावित कामे पूर्णत्वास जाण्यासाठी समितीव्दारे नियमितपणे आढावा घेण्यात येतो. आराखड्यांतर्गत येणाऱ्या विविध विकासकामांना प्रशासकीय मान्यता व निधीची तरतूद करुन देण्यात आली आहे. त्यानुसार विकासकामे गतीने पूर्ण होण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करावे. विकास आराखड्यांतर्गत येणारी लोणार सरोवर व परिसरातील नागरी सुविधांची कामे गुणवत्तापूर्ण व दर्जेदार करावीत, असे निर्देश त्यांनी संबंधित कार्यान्वयन यंत्रणांना दिले.

सरोवरातील पाण्याचा उपयोग होण्यासाठी पाण्याची 'पीएच व्हॅल्यू' भुजल सर्वेक्षण विभाग व निरीच्या तज्ज्ञांकडून तपासून घेण्यात यावी, अशा सूचना समितीने संबंधित यंत्रणांना केल्या. भारतीय पुरातत्व विभागाच्या अखत्यारित येत असलेल्या १५ मंदिरांचे जतन, संरक्षण व सुशोभिकरण अंतर्गत येणारी दुरुस्तीची कामे पुरातत्व विभागाने करावयाची असून त्यासाठी निधीची तरतूदही करण्यात आली आहे. लोणार सरोवर परिसरातील गायमुख मंदिरस्थळी भेट देणाऱ्या पर्यटक व नागरिकांकडून आंघोळीसाठी शॅम्पू, डिर्टजंन्ट व साबून वापरण्यात येत असल्याचे आढळून आले आहे. यामुळे लोणार सरोवरातील पाणी दुषित होत असून त्यातील जैवविविधतेवर संकट निर्माण होत आहे. त्यामुळे नागरिकांना त्याठिकाणी आंघोळीसाठी प्रतिबंध करण्याबाबतच्या सूचना जिल्हा प्रशासनाला विकास आराखडा समितीने दिल्या.

लोणार सरोवराला भेट देणाऱ्या पर्यटकांची संख्या, त्यांना आवश्यक असणाऱ्या सुविधांच्या माहितीचा अहवाल नियमितपणे समितीला सादर करण्यात यावा, अशा सूचना डॉ. पाण्डेय यांनी वन विभागाला दिल्या. सरोवर परिसरात पर्यटकांसाठी स्वच्छतागृहे, निवारा, सांडपाणी प्रक्रिया प्रकल्पांची उर्वरित कामे गतीने पूर्ण करण्यात यावीत. विद्यापीठाकडून उभारण्यात येणाऱ्या लोणार विज्ञान केंद्र व संशोधन प्रयोगशाळेचे काम वेळेत पूर्ण व्हावे, जेणेकरून उमद्या संशोधकांकडून संशोधनाला चालना मिळेल. लोणार सरोवर परिसरातील 'ईको टुरिझम' चे काम पूर्णत्वास जाण्यासाठी वनविभागाने जबाबदारीपूर्वक प्रयत्न करावे, असेही डॉ. पाण्डेय यांनी यावेळी सांगितले.

# पोलिस भरती प्रतीक्षा यादीचा प्रश्न गाजला

## आ. सुलभा खोडके यांचा विधानसभेत प्रश्न

**दि.१६विदर्भ प्रजासत्ताक नागपूर -** दोन वर्ष उलटून सुद्धा वर्ष २०२१-२०२२ मधील मुंबई पोलिस भरतीमधील प्रतीक्षा यादीतील हजारो उमेदवार नियुक्ती मिळण्याच्या प्रतीक्षेत आहेत. यासाठी त्यांनी नागपूर हिवाळी अधिवेशनावर आंदोलन पुकारले असता अमरावतीच्या आ. सुलभा खोडके यांनी विधानभवनात प्रश्न उपस्थित करून नियुक्तीच्या प्रतीक्षेत असलेल्या हजारो उमेदवारांची वैद्यकीय पडताळणी करून त्यांना पोलिस सेवेत भरती करण्याची मागणी सभागृहात लावून धरली. मुंबई पोलिस भरतीमधील निवड यादीतील हजारो उमेद्वार हे नागपूर अधिवेशनावर आंदोलनाला बसले असून यात अमरावती जिल्ह्यातील उमेदवारांचा सुद्धा समावेश आहे. दरम्यान, सुलभा खोडके यांनी आंदोलनस्थळी भेट देऊन त्यांच्या मागण्या जाणून घेत अधिवेशनात मुद्दा उपस्थित केला. गृह विभागात भरपूर प्रमाणात रिक्त पदे असतांना सुद्धा पोलिस भरती होत नसल्याने पोलिस विभागावर कामाचा ताण येत आहे. मुंबई पोलिस दलात तब्बल २६ हजारपर्यंत शिपाई पदे रिक्त आहेत. त्यापैकी पोलिस विभागाने १० हजार पदे भरण्याचा निर्णय घेतला होता; मात्र ७०७६ पदांची, म्हणजेच ७० टक्के पदांची भरती प्रक्रिया राबविण्यात आली. ही



भरती प्रक्रिया १०० टक्के नसून त्यामध्ये अजूनही ३ हजाराहून अधिक पदे रिक्त आहेत. तसेच त्यावेळी प्रतीक्षा यादीतील सर्व पात्र उमेद्वारांची कागदपत्रे पडताळणी व पोलिस व्हेरिफिकेशन करण्यात आले. परंतु त्यांना अजूनही नियुक्ती देण्यात आली नसून त्यांची वयोमर्यादा संपत असल्याने त्यांना नियुक्तीची प्रतीक्षा लागली आहे. याबाबत सुलभा खोडके यांनी सभागृहाला अवगत करून उपमुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे लक्ष वेधले. यावर सभागृहा समक्ष उत्तर देतांना उपमुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले की , ज्यांची निवड झाली आहे, त्यांची वयोमर्यादा संपणार नाही. प्रशिक्षणाची क्षमता आपण वाढवत असून एक-एक बॅच आपण तयार करून प्रक्रिया पूर्ण करीत आहोत; मात्र सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाप्रमाणे प्रतीक्षा यादी एका वर्षाच्या वर राहात नसल्याने त्यांना घेता येत नाही .मात्र ज्यांची थेट निवड झाली त्यांना चिंता करण्याची गरज नसून त्यांना शंभर टक्के नोकरी मिळणार असल्याचे फडणवीस यांनी सभागृहात स्पष्ट केले.

# पंचायत समिती पोटनिवडणूक



## मतदानाकरिता दोन तासाची सवलत;

### सार्वजनिक सुट्टी लागू नाही अशा आस्थापनेवरील मजूर कर्मचाऱ्यांना सवलत

**दि.१६विदर्भ प्रजासत्ताक अमरावती, -** अमरावती जिल्हापरिषद अंर्तगत पंचायत समिती चांदुर रेल्वे निर्वाचक गण क्र.९८ सातेफळ येथे पोटनिवडणूक होत आहे.

पंचायत समिती चांदुर रेल्वे निर्वाचन गण क्र.९८ सातेफळ क्षेत्रातील मतदारांना मतदानाचा हक्क बजावता यावा

याकरिता निवडणूक कार्यक्रम लागू असलेल्या क्षेत्रात रविवार दि. १७ डिसेंबर रोजी इतर सर्व आस्थापना (ज्यांना सुट्टी लागू होत नाही) त्यांच्या आस्थापनेवरील क्षेत्रातील रहिवासी असलेले अधिकारी,कर्मचारी, मजूर, कामगार यांना मतदान करता येणे शक्य व्हावे.याकरिता कामाच्या तासातून दोन तासाची सवलत देण्याचे आदेश जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांनी दिले आहेत.

पंचायत समिती चांदुर रेल्वे निर्वाचन गण क्र.९८-सातेफळ अंर्तगत अंतर्भूत असलेली गावे याप्रमाणे : १) सातेफळ २) धनोडी ३) टेंभूर्णी ४) अमदोरी ५) निमला ६) कळमजापुर ७) चांदूर वाडी ८) राजना ९) बागापुर १०) सुपलवाडा ११) सांगूलवाडा १२) ईस्माईलपुर १३) वाई १४) शिरसगाव कोरडे १५) वडगांव भट १६) मांडवा १७) लसनापुर १८) तुळजापुर १९) दिलावरपुर २०) धनापुर या गावांच्या क्षेत्रात निवडणूक होणार आहे.




## हिवाळ्यात बद्धकोष्ठता आणि आंबट ढेकरपासून सुटका हवीय?

दि.१५विदर्भ प्रजासत्ताक आंबट ढेकर येणं म्हणजे पोट बिघडणं. जेव्हा एखादी व्यक्ती जास्त खाते किंवा वेगाने जेवते तेव्हा त्यांना आंबट ढेकर येण्यास सुरुवात होते. काही लोक आंबट ढेकर येण्याची तक्रार करतात. आंबट ढेकर देखील अपचनामुळे होतात. अपचन, धूम्रपान, तणाव, कोल्ड ड्रिंक्स, मद्यपान केल्याने आंबट



### 'हे' घरगुती उपाय एकदा करून पाहाच..

ढेकर येणे, पोटात आणि छातीत जळजळ होणे, उलट्या होणे, पोट फुगणे, घसा दुखणे यांसारख्या अनेक समस्या होतात. अशा परिस्थितीत वेळेवर उपचार करणे खूप महत्वाचे आहे. हिवाळ्यात आंबट ढेकर आणि बद्धकोष्ठतेच्या समस्येपासून कशी सुटका मिळवू शकता या संदर्भात अधिक माहिती जाणून घेऊयात.

आंबट ढेकर आणि बद्धकोष्ठता पासून आराम कसा मिळवाल?

लिंबूपाणी

जर तुम्हाला सकाळी उठल्याबरोबर आंबट ढेकर येणे किंवा बद्धकोष्ठतेची समस्या असेल तर लगेच एक ग्लास पाण्यात लिंबू टाकून प्या. तुम्ही त्यात चिमूटभर मीठही घालू शकता. यामुळे तुमच्या पोटाला त्वरित आराम मिळेल.

बडीशेप आणि साखर

जर तुम्हाला रात्रीच्या वेळी आंबट ढेकर येण्याच्या समस्येचा सामना करावा लागत असेल तर लिंबू पाणी आणि दही अजिबात खाऊ नका. यामुळे तुमच्या समस्या खूप वाढू शकतात. रात्रीच्या वेळी तीव्र ढेकर येत असल्यास, तुम्ही साखर आणि बडीशेप एकत्र खाऊ शकता. यामुळे तुम्हाला तात्काळ आराम मिळेल. बडीशेप पचनसंस्थेसाठी चांगली असते. यामुळे ॲसिडिटी आणि गॅसच्या समस्येपासून आराम मिळतो. साखर खाल्ल्याने पोट थंड राहते.

काळे मीठ

काळे मीठ खाल्ल्याने पचनक्रिया चांगली राहते. आंबट ढेकर येत असल्यास काळे मीठ आणि जिरे एकत्र करून खाल्ल्यास त्वरित आराम मिळतो. जर तुम्हाला वारंवार आंबट ढेकर येण्याची समस्या होत असेल तर १०० ग्रॅम जिरे एका तव्यावर नीट तळून घ्या आणि चांगले बारीक करा. नंतर एक ग्लास पाणी घ्या आणि त्यात एकत्र मिक्स करा. हे पाणी प्यायल्याने त्वरित आराम मिळेल.

# 'प्रति थेंब, अधिक पिक' योजना अनुसूचित जाती व जमाती शेतकरी लाभार्थ्यांसाठी विशेष मोहिम



**दि.१६विदर्भ प्रजासत्ताक अमरावती, -** राष्ट्रीय कृषि विकास योजना 'प्रति थेंब, अधिक पिक' या योजनेंतर्गत शेतकऱ्यांसाठी ठिबक व तुषार संचाची खरेदी करण्यासाठी अनुदान दिल्या जाते. सद्यास्थितीत उपलब्ध निधीच्या तुलनेत अनुसूचित जाती व जमाती प्रवर्गातील लाभार्थ्यांच्या अर्जाची संख्या कमी असल्याने या प्रवर्गासाठी दि. १८ ते ३१ डिसेंबर २०२३ या कालावधीत विशेष पंधरवाडा मोहिम राबविण्यात येत आहे. अनुसूचित जाती व जमाती प्रवर्गातील शेतकरी लाभार्थ्यांनी या मोहिमेचाकलध लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी राहुल सातपुते यांनी केले आहे.प्रधानमंत्री कृषि सिंचन योजनेंतर्गत अल्प व अत्यल्प लाभार्थ्यांना ठिबक संच, तुषार संच हे ४५ टक्के व ५५ टक्के या अनुदान दिले जाते. तसेच मुख्यमंत्री शाश्वत कृषी सिंचन योजनेंतर्गत ठिबक सिंच व तुषार संच यांच्या खरेदीसाठी २५ टक्के व ३० टक्के अनुदान दिले जाते. अनुसूचित जातीच्या लाभार्थ्यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वावलंबन मिशन अंतर्गत अल्प व अत्यल्प लाभार्थ्यांना ३५ टक्के पुरक अनुदान व इतर लाभार्थ्यांना ४५ टक्के पुरक अनुदान असे एकूण ९० टक्के अनुदान दिल्या जाते. अनुसूचित जमाती प्रवर्गातील लाभार्थ्यांना बिरसा मुंडा योजनेंतर्गत अल्प व अत्यल्प लाभार्थ्यांना ३५ टक्के पुरक अनुदान व इतर लाभार्थ्यांना ४५ टक्के पुरक अनुदान असे एकूण ९० टक्के अनुदान दिल्या जाते.योजनेंतर्गत ठिबक व तुषार सिंचन संचाचा लाभ घेण्यास इच्छुक शेतकऱ्याकडे मालकी हक्काचा सातबारा, ८ अ व ओलीताची सोय असणे आवश्यक आहे. तसेच योजनेचा लाभ घेण्यासाठी लाभार्थ्यांनी महाडीबीटी पोर्टलवर अर्ज करणे आवश्यक राहिल.

कोणत्याही शंका किंवा अभिप्रायासाठी आम्हाला ईमेल करा -prajasattaknews24gmail.com
या पृष्ठावरील जाहिरातींसाठी किंवा मोफत अंक मो.वर मिळण्यासाठी संपर्क मो.८६२४९८५६३३, प्रिंट / PDF / वेब - पोर्टल /ई - पेपर

# घरकुलाचा लाभ श्रीमंत व्यक्तीला गरीब मात्र रस्त्यावर

## तालुक्यातील ग्रामपंचायत सरपंच व अधिकारी यांच्या मिली भगत मुळे गरीब परिवार रस्त्यावर

**दि.१६ विदर्भ प्रजासत्ताक चांदुर बाजार –** ग्रामीण भागात रमाई योजना, मोदी आवास योजना शबरी आवास योजनेच्या माध्यमातून शासनाकडून गरजू ,गोरगरिबांना घरकुलांसाठी अनुदान देण्यात येते मात्र या मध्ये अनेक ठिकाणी बोगस अधिकारी व ग्रामपंचायत सरपंच यांच्या मिलीभगत मुळे खऱ्या घरकुल लाभार्थी ला घर उपलब्ध होत नाही त्यामुळे गरीब परिवार हा बेघर राहून रस्त्यावर आपला उदरनिर्वाह करत असतो या बोगस कारभार सध्या चांदुर बाजार मध्ये सुरू आहे श्रीमंत व्यक्ती हा श्रीमंत होत आहे गरीब मात्र रस्त्यावर येत आहे ही शोकांतिका सध्या चांदूरबाजार तालुक्यामध्ये सुरू असून यावर अधिकारी गप आहे या सुरू असलेल्या भोंगळ करभार ची चौकशी करून योग्य ती कारवाई अधिकारी व सरपंचावर करावी अशी मागणी तालुक्यातील नागरिक व सुरेश अर्डक,वंदना अर्डक, निर्गुण अर्डक यांनी



केली आहे तर ग्रामीण भागात शासनातर्फे अनुदानापेक्षा बांधकाम व साहित्य खर्च अधिक असल्याने कर्जबाजारी होत लाभार्थ्यांना घरकुल बांधावे लागत आहे. त्यामुळे गोरगरिबांच्या घराचे स्वप्न कधी पूर्ण होणार, असा प्रश्न चांदूरबाजार तालुक्यात घरकुल लाभार्थ्यांकडून उपस्थित केला जात आहे. ग्रामीण भागात शासनाकडून घरकुलासाठी लाभार्थ्यांना एक लाख वीस हजार रुपये मिळतात तर शहरी भागातील लाभार्थ्यांना दोन लाख ५० हजार रुपये देण्यात येतात. हि फार मोठा तफावत कशामुळे. ग्रामीण भागात का, साहित्य सस्त्या भावात मिळतात का ?असा सुद्धा घरकुल लाभार्थ्यांचा कडून प्रश्न उपस्थित होत आहे असे अनेक प्रश्न चांदुर बाजार मध्ये सध्या सुरू आहे या वर खऱ्या लाभार्थ्यांना अधिकाऱ्याकडून घर उपलब्ध होणार का श्रीमंत व्यक्तीलाच याचा फायदा होणार याकडे तालुक्यातील नागरिकांचे लक्ष लागले आहे व ज्या बोगस श्रीमंत व्यक्तीला ग्रामपंचायत व अधिकारी यांनी घर उपलब्ध करून दिले त्यावर कारवाई होणार का याचे सुद्धा लक्ष तालुक्यातील नागरिकांचे लागले आहे. –

### तालुक्यातील गरीब परिवार घर द्या

चांदुर बाजार मध्ये अनेक ठिकाणी आमच्या सारखे गरीब हे गरीब राहिले आहे अनेक निवेदन देऊन सुद्धा आम्हला घर उपलब्ध झाले नाही मात्र श्रीमंत व्यति ला घर असून त्या व्यति ला घर उपलब्ध होत आहे असे प्रकार सध्या चांदुर बाजार तालुका मध्ये सुरू आहे यांची चौकशी करून बोगस अधिकारी व ग्रामपंचायत यावर कारवाई करा.

**सुरेश अर्डक शिरजगाव अर्डक**

# अंगणवाडी सेविकांचा १९ ला महाआक्रोश मोर्चा

**दि.१६विदर्भ प्रजासत्ताक अमरावती :** १४ अंगणवाडी सेविका व मिनी अंगणवाडी सेविका, मदतनीस यांचे मानधन वाढ, त्यांना कर्मचाऱ्यांच्या दर्जा व सेवानिवृत्तीनंतर पेंशन व इतर प्रलंबित मागण्यासंदर्भात संघटनेच्या वतीने नागपूर येथे अधिवेशनावर महाआक्रोश मोर्चाचे आयोजन करण्यात आले असून जिल्ह्यातून या मोर्चात हजारोंच्या संख्येने अंगणवाडी सेविका सहभागी होणार आहे. नागपूर येथील यशवंत स्टेडियम धंतोली येथून महाआक्रोश मोर्चाला सुरूवातहोणार आहे. हिवाळी अधिवेशनावर १९ डिसेंबर रोजी सकाळी १० वाजता हा मोर्चा धडकणार आहे. तेथे एकदिवशीय धरणे आंदोलन होईल. दुपारी ३ वाजता महिला व बालकल्याण मंत्री व संबंधित खात्याच्या सचिव यांच्यासोबत मागण्यांच्या संदर्भात निवेदन देऊन चर्चा करण्यात येणार आहे.

जिल्ह्यात प्रलंबित मागण्यांकरिता अंणगवाडी सेविकांनी ४ डिसेंबरपासून कामबंद आंदोलन सुरू केल्यामुळे जिल्ह्यातील सर्वच अंगणवाडी केंद्र बंद आहेत. परंतु शासनाकडून अद्यापही

याची दखल न घेतल्यान १९ डिसेंबरला याच मागण्यांकरिता आक्रोश मोर्चाचे आयोजन अध्यक्ष संजय मापले, रतन गुजर, शालिनी देशमुख, चंदा नवले, रेखा गुंबळे, विमल बोरकुटे, बबिता बहोरिया, वंदना धाकडे, ज्योती डोंगरे, रंजना कडू, साधना काळे, कोकिळा चर्जन, लता दहातोंडे, मंजू जगताप, शिल्पा काळे माला धुमाळ, करूणा तायडे, रूपाली हिरूळकर, अनिता गोमासे, रेखा राऊत, करूणा पांडे, सुलभा राऊत, मंगला विधळे, मीरा सोलव, मिनाक्षी गायकवाड यांच्या नेतृत्वात करण्यात आले आहे.



# स्व. दत्तात्रय पुसदकर महाविद्यालयात एड्स जनजागृती कार्यक्रम संपन्न




**दि१६ विदर्भ प्रजासत्ताक नांदगाव पेठ –** नांदगाव पेठ येथील स्व. दत्तात्रय पुसदकर कला महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभाग आणि रेड रिबीन क्लब च्या वतीने एड्स जनजागृतीपर कार्यक्रमांतर्गत डॉ. सौ. सुनीता बाळापुरे यांचे'एड्स रोग-समज गैरसमज' या विषयावरील विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. व्याख्यानाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.विजय दरणे हे होते.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला वैराग्यमूर्ती श्री संत गाडगे बाबा यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाला सुरुवात करण्यात आली. राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी डॉ.गोविंद तिरमनवार यांनी या विशेष व्याख्यानाच्या आयोजनामागची भूमिका प्रास्ताविकातून स्पष्ट केली.कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते डॉ. सौ. सुनीता बाळापुरे यांनी एड्स या रोगाविषयी असलेले गैरसमज आणि हा आजार कशामुळे होतो यासंदर्भात विस्तृत माहिती आपल्या व्याख्यानातून दिली. एड्स झालेल्या रुग्णांविषयी सर्वांनी सहानुभूती ठेवून त्यांना आवश्यक ती मदत करीत त्या व्यक्तीचे मनोबल वाढवून आपण त्याचे जगणे कसे सुसह्य करू शकतो यासंदर्भातील उपयुक्त माहितीही त्यांनी आपल्या व्याख्यानातून विद्यार्थ्यांना दिली.

कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. विजय दरणे यांनीही अध्यक्षीय भाषणातून उपयुक्त असे मार्गदर्शन उपस्थितांना केले. या कार्यक्रमाप्रसंगी महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेविका कु. ईश्वरी दिलीपराव अटाळकर हिची आव्हान- २०२३ राज्यस्तरीय आपत्ती व्यवस्थापन शिबिरा करिता निवड झाल्याबद्दल पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन करण्यात आले.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु. शीतल मेटेकर आणि आभार प्रदर्शन कु. सपना धर्माळे यांनी केले. या कार्यक्रमाला महाविद्यालयातील डॉ.पी .आर. जाधव ,प्रा. राजेश ब्राह्मणे ,डॉ. श्रीकांत माहुलकर, रासेयो सह कार्यक्रमाधिकारी डॉ. सुभाष पवार ,डॉ. विकास अडलोक, डॉ. पंकज मोरे, ज्ञानेश्वर बारस्कर, रेखा पुसदकर ,विनायक पावडे, दिलीप पारवे, अनिल शेवतकर, राहुल पांडे आणि सर्व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# गोरगरीब रुग्णांना पंचतारांकित आरोग्य सुविधा देण्यासाठी भाजप सरकार कटिबद्ध-संजय गाते

## आयुष्यमान भारत योजनेमुळे रुग्णांना मोठा दिलासा, महाआरोग्य शिबिराचा शेकडो रुग्णांनी घेतला लाभ

**दि.१६ विदर्भ प्रजासत्ताक नांदगाव पेठ –** प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या दूरदृष्टीने देशातील प्रत्येक गोरगरीब रुग्णाला आरोग्याच्या चांगल्या सुविधा मिळाव्यात यासाठी प्रयत्न सुरू आहेत. देशात शंभरच्या वर वैद्यकीय महाविद्यालये सुरू करण्यात आली तर आयुष्यमान भारत या योजनेच्या माध्यमातून प्रत्येक रुग्णाला उपचारासाठी पाच लक्ष रुपयांपर्यंत आर्थिक तरतूद करण्यात आली शिवाय राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या माध्यमातून महात्मा फुले जन आरोग्य योजनेची मर्यादा अडीच लाख रुपयांवरून पाच लाख रुपये करण्यात आली त्यामुळे गोरगरीब रुग्णांना पंचतारांकित आरोग्य सुविधा देण्यासाठी भाजप सरकार कटिबद्ध असल्याचे प्रतिपादन भाजप ओबीसी मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष संजय गाते यांनी केले.नांदगाव पेठ येथे आयोजित महाआरोग्य शिबिराच्या उदघाटन प्रसंगी ते बोलत होते. पुढे बोलतांना ते म्हणाले की ८० टक्के समाजकारण करणे हा आमच्या मूळ उद्देश आहे.नांदगाव पेठ परिसरातील गोरगरीब रुग्णांसाठी निशुल्क तपासणी आणि औषधोपचार करून त्यांनी सामाजिक बांधिलकी निभावली आहे. या आरोग्यदायी उपक्रमाला त्यांनी भरभरभरून शुभेच्छा सुद्धा यावेळी दिल्या. शालिनीताई मेघे हॉस्पिटल अँड रिसर्च सेंटर, जीवनविकास संस्था नागपूर तसेच भाजप ओबीसी मोर्चा महाराष्ट्र प्रदेश यांच्या संयुक्त विद्यमाने शुक्रवारी नांदगाव पेठ येथील ग्रामपंचायत प्रांगणात भाजपा महाराष्ट्र प्रदेश ओबीसी मोर्चा उपाध्यक्ष रविराज देशमुख यांच्या वतीने परिसरातील रुग्णांसाठी हे भव्य आयोजन करण्यात आले होते.

# बाजीराव मस्तानी गुटखा विरोधात अलर्ट जारी

## अचलपूर उपविभागीय पोलीस अधिकारी अतुल नवगिरे एक्शन मोडवर

**दि.१६ विदर्भ प्रजासत्ताक अचलपूर –** मागील काही दिवसा अगोदर चांदूर बाजार तालुक्यातील रिद्धपूर गावातील माथेफिरु तरुणांने छत्रपती शिवाजी महाराज यांची वादग्रस्त फोटो पोस्ट व्हायरल केल्याने जिल्ह्यासह शहरात बंद पुकारण्यात आला होता. अशातच महान मराठा वीर योद्धा बाजीराव पेशवा यांच्या नावाने गुटखा विक्री होत असल्याने जनमानसात प्रचंड संताप व्यक्त होत आहे. तर राज्यात गुटखाबंदी असतांना अचलपूर, परतवाडा, चांदुर बाजार तालुक्यात खुलेआम गुटखा विक्री कोणाच्या आशीर्वादाने सुरू आहे. यावर पोलीस विभाग कडून त्वरित लगाम लागावा यासाठी शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख प्रितेश अवघड व शिष्टमंडळाने अचलपूर उपविभागीय पोलीस अधिकारी अतुलकुमार नवगिरे यांची भेट घेऊन निवेदन दिले महापूरुषांचा अवमान करणाऱ्या विरुद्ध कारवाई न झाल्यास आंदोलनाचा इशारा दिला आहे.



### गुटखा प्रतिबंधात्मक साठी ठाणेदारांना सूचना

शिवसेनेचे निवेदन प्राप्त झाले. त्यामधील महापुरुषांचे नावे असलेल्या गुटक्यावर उपविभागाच्या अधिनस्त येत असलेल्या सर्व ठाणेदारांना गुटखा प्रतिबंधात्मक कारवाई मोहीम राबवून आणि महापुरुषांच्या नावे असलेल्या बाजीराव मस्तानी गुटखा विक्रेत्यावर कठोर कारवाईच्या सूचना देण्यात आल्या आहे. असे आमच्या प्रतिनिधीशी बोलतांना अचलपूर उपविभागीय पोलीस अधिकारी अतुलकुमार नवगिरे यांनी प्रतिक्रिया दिली.

# पीएमश्री स्कुल -जवाहर नवोदय विद्यालय प्रवेश परीक्षा जानेवारीत

## मानसिक क्षमता,अंकगणित, भाषा,इंग्रजी,विज्ञान,सोशल सायन्स, गणित हे विषय राहणार.....

**दि.१५ विदर्भ प्रजासत्ताक अमरावती –** ग्रामीण भागातील हुशार विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण देण्यासाठी आणि त्यांच्या सर्वांगीण विकासाला चालना देण्यासाठी पीएमश्री स्कुल म्हणजे जवाहर नवोदय विद्यालय निवड चाचणी अर्थातच जेएनव्हीएसटी ही परीक्षा पीएमश्री स्कुल जवाहर नवोदय विद्यालयांकडून घेतली जाते.ती या निवासी शाळांचे प्रवेशद्वार म्हणून काम करत आहे. जेएनव्हीएसटीची स्थापना ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमधील बौद्धिक क्षमता ओळखण्याच्या आणि त्यांचे संगोपन करण्याच्या दृष्टिकोनातून करण्यात आली आहे. त्याचे प्राथमिक उद्दिष्ट देशभरातील पीएमश्री स्कुल जवाहर नवोदय विद्यालयांच्या प्रवेशासाठी इयत्ता सहावीतील विद्यार्थ्यांची निवड करणे आहे. परीक्षा हे होतकरू विद्यार्थ्यांचा शोध घेण्याचे एक साधन आहे. शहरी-ग्रामीण शैक्षणिक भेद दूर करणे आणि उज्ज्वल भवितव्यासाठी सर्वांना समान संधी देण्याचा प्रयत्न आहे.

सदर ची परीक्षा हि सहाव्या वर्गासाठी २० जानेवारी २०२४ वर्ग ९ साठी शनिवारी १०फेब्रूवारी २० २४,व वर्ग ११ वी करीता शनिवार १०फेब्रुवारी २०२४ ला परीक्षा घेण्यात येणार आहे. पीएमश्री स्कुल जवाहर नवोदय विद्यालय असलेल्या जिल्ह्यातील रहिवासी उमेदवारच प्रवेशासाठी अर्ज करण्यास पात्र आहेत. सहावीमध्ये प्रवेश घेऊ इच्छिणारा उमेदवार १० ते १२ वयोगटातील असावा.हाच नियम अनुसूचित जाती अर्थातच एससी आणि अनुसूचित जमातींमधील अर्थातच एसटी उमेदवारांसह सर्वांना लागू होतो. इयत्ता सहावीला प्रवेश घेऊ इच्छिणारा उमेदवार सरकारी / अनुदानित/मान्यताप्राप्त शाळेतून तिसरी,चौथी आणि पाचवीची परीक्षा उत्तीर्ण झालेला असावा.यासोबतच पीएमश्री नवोदय विद्यालयाचे रहिवासी आणि इयत्ता आठवीचा अभ्यास




करत असलेले उमेदवारच नववीच्या प्रवेशासाठी पात्र आहेत.जिल्ह्यातील मान्यताप्राप्त शाळा जेथे पीएमश्री स्कुल जवाहर नवोदय विद्यालय कार्यरत आहे आणि जेथे प्रवेश मागितला आहे,ते पात्र आहेत. प्रवेश घेऊ इच्छिणारा उमेदवार प्रवेशाच्या वर्षाच्या १ मे रोजी १३-१५ वर्षे वयोगटातील असावा.हा नियम सर्व वर्गातील उमेदवारांना लागू आहे. परीक्षेसाठी भाषेचे माध्यम इंग्रजी / हिंदी आहे. तसेच अकरावीसाठी पात्रतेसाठी उमेदवाराने सीबीएसई किंवा इतर कोणत्याही राज्य शिक्षण मंडळाशी / इतर सरकार मान्यताप्राप्त मंडळाशी संलग्न असलेल्या मान्यताप्राप्त शाळेतून दहावीचे शिक्षण घेतलेले असावे.भारतातून दहावीचे शिक्षण घेतलेले भारतीय नागरिकच अर्ज करण्यास पात्र आहेत. निवड चाचणी सकाळी ११ ते दुपारी दिडपर्यंत अशी एकूण अडीच तासांची असेल.त्यात वस्तुनिष्ठ प्रश्नांचे ५ विभाग असतील.१०० गुणांसाठी एकूण १०० प्रश्न असतील.या प्रवेश परीक्षा प्रक्रिया संदर्भात अधिक माहिती करिता प्रवेश इच्छुक विद्यार्थ्यांनी कार्यालयीन वेळेत अमरावती येथील नवसारी परिसर स्थित पीएमश्री स्कुल जवाहर नवोदय विद्यालय,अमरावती येथे संपर्क साधावा. असे आवाहन प्राचार्य-ससिंद्रन सी. के. यांनी केले आहे.

# अखेर मुख्यमंत्री, मंत्रीदेखील लोकायुक्तांच्या कक्षेत

## भ्रष्टाचाराच्या प्रकरणात कारवाईचे अधिकार : विधानपरिषदेत लोकायुक्त विधेयकाला एकमताने मंजुरी

**दि.१५विदर्भ प्रजासत्ताक नागपूर :** जुन्या लोकायुक्त कायद्यानुसार लोकायुक्तांना भ्रष्टाचाराच्या प्रकरणांत थेट कारवाईचा कुठलाही अधिकार नव्हता. मात्र आता लोकायुक्तांना भ्रष्टाचाराच्या प्रकरणांसोबतच अगदी मुख्यमंत्री, मंत्री किंवा इतर लोकप्रतिनिधींवर कारवाईचा अधिकारदेखील मिळणार आहे. मागील वर्षी विधानसभेत मंजूर झालेल्या लोकायुक्त विधेयकाला शुक्रवारी विधानपरिषदेत एकमताने मंजुरी देण्यात आली. या कायद्यात आता भ्रष्टाचार प्रतिबंधक तरतुदींचा समावेश झाला आहे. केंद्रातील लोकपाल कायद्यानंतर महाराष्ट्रात लोकायुक्त कायदा व्हावा हा समाजसेवक अण्णा हजारे यांचा आग्रह होता. त्यांचा समावेश असलेल्या समितीचा मसुदा कुठलाही बदल न करता विधेयकाच्या माध्यमातून मांडण्यात आला होता हे विशेष.



राज्यातील लोकायुक्त कायदा जुना असून त्यात भ्रष्टाचार निर्मूलन कायद्याच्या तरतुदींचा समावेशच नाही. लोकायुक्तांना ठोस कारवाईचे अधिकार नव्हते.

राज्यातील नागरिकांना भ्रष्टाचाराच्या विरोधात तक्रार करता यावी यासाठी राज्यात सक्षम लोकायुक्त कायदा असणे आवश्यक असल्याची मागणी अण्णा हजारेंनी केली होती. अण्णा हजारे यांनी उपोषण केले होते व त्यानंतर एक संयुक्त समिती तयार करण्यात आली होती. त्यात अण्णा हजारेदेखील होते. अण्णांच्या मंजुरीनंतर तयार झालेला मसुदा विधेयकाच्या माध्यमातून मांडण्यात आला होता.

मागील वर्षी विधानसभेत याबाबतचे विधेयक मंजुर झाले होते. त्यानंतर त्यात सुधारणेसाठी दोन्ही सभागृहांची संयुक्त समिती गठीत करण्यात आली होती. त्या समितीचा अहवाल राधाकृष्ण विखे पाटील यांनी परिषदेसमोर मांडला. त्यानंतर उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या कायद्यातील तरतुदींवर प्रकाश टाकला. केंद्राच्या कायद्याच्या धर्तीवरच या लोकायुक्त कायद्यात बदल करण्यात आले आहेत. विधेयकामुळे मुख्यमंत्र्यांसह सर्व मंत्री आणि लोकप्रतिनिधी लोकायुक्तांच्या छाननीखाली येतील. तसेच भ्रष्टाचाराच्या प्रकरणात आता लोकायुक्तांना संबंधित दोषींवर थेट कारवाई करता येणार आहे, असे फडणवीस यांनी स्पष्ट केले. फडणवीस यांनी या विधेयकाबाबत माहिती दिल्यानंतर मंत्री दीपक केसरकर यांनी विधेयक मंजुरीसाठी सभागृहासमोर मांडले. सभागृहाने एकमताने याला मंजूर केले. विरोधी पक्षनेते अंबादास दानवे, सदस्य भाई जगताप, सचिन अहिर यांनी काही सूचना देऊन या विधेयकाला पाठिंबा दिला.

कलर बॉक्स

### लोकायुक्तांची निवड पारदर्शक पद्धतीनेच

लोकायुक्तांच्या निवडीत पारदर्शकता ठेवण्यात आली आहे. निवड समितीत मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, विधानपरिषदेचे सभापती, विधानसभेचे अध्यक्ष, दोन्ही सभागृहांचे विरोधी पक्षनेते, उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश यांचा समावेश असेल. त्यामुळे लोकायुक्तांची निवड कुणाच्याही दबावाशिवाय व पात्रतेच्या आधारवरच होईल, असे फडणवीस यांनी स्पष्ट केली.

### लग्नाच्या वऱ्हाडावर काळाचा घाला

# नागपुरात भीषण अपघातात सहा जणांचा दुर्दैवी मृत्यू



**दि.१६ विदर्भ प्रजासत्ताक काटोल –** नागपूर जिल्ह्यातील काटोलमध्ये क्वालीस आणि ट्रकचा भीषण अपघात झाला आहे. अपघातात सहा जणांचा मृत्यू झाला असून एकजण गंभीर जखमी झाला आहे.

काल मध्यरात्री काटोल तालुक्यातील सोनखांब आणि ताराबोडी दरम्यान ही घटना घडली.

क्वालीस गाडी नागपूरवरून काटोलच्या दिशेनं जात असताना ट्रकनं गाडीला जोरदार धडक दिली आणि भीषण अपघात झाला. या अपघातात सहा जणांचा मृत्यू झाला आहे.नागपुरात एका लग्नाचा कार्यक्रम आटपून हे सर्वजण काटोलच्या दिशेनं जात होते त्यावेळी भीषण अपघात झाला. जखमीला नागपुरातील शासकीय वैद्यकीय रुग्णालयात ट्रॉमा सेंटरमध्ये दाखल करण्यात आलं आहे.

# ई-पीक पाहणीऐवजी केंद्र शासनाचा डिजिटल क्रॉप सर्व्हे!

## रब्बी हंगामात पश्चिम विदर्भातील १५ गावांमध्ये अंमलबजावणी

**दि.१६ विदर्भ प्रजासत्ताक अमरावती :** राज्य शासनाच्या ई-पीक पाहणीद्वारे गतवर्षीपासून ऑनलाइन पीक पेरा नोंदविण्यात येत आहे. मात्र एक-दोन वर्षात ही पद्धत बंद होण्याची शक्यता आहे. त्याऐवजी केंद्र शासनाच्या डिजिटल क्रॉप सर्व्हे ॲपद्वारे पीक नोंदविण्यात येणार आहे. सध्या पश्चिम विदर्भातील १५ गावांमध्ये हा पथदर्शी प्रकल्प राबविण्यात येत आहे.जमाबंदी विभागाच्या ॲपच्या तुलनेत काही अद्यावत बदल केंद्र शासनाच्या ॲपमध्ये करण्यात आलेला आहे. याशिवाय एक खासगी सहायक देखील नियुक्त करण्यात आलेला आहे. तो शेतकऱ्यांना या ॲपद्वारे



ऑनलाइन पीक पेरा नोंदविण्यास बदल करेल. अमरावती जिल्ह्यात गोंडविहीर, रहीमापूर, संभेगाव, यवतमाळ जिल्ह्यात नेरळ, निब्बो, ब्राह्मणवाडा पूर्व, अकोला ाजिल्ह्यात बिरसिंगपूर, ताकवाडा, चिखलवाड, बुलडाणा जिल्ह्यात अफजलपूर, वडाळी, देउळखेड, व वाशिम जिल्ह्यातील कुऱ्हाड, कानडी व वडप यागावांत केंद्र शासनाचा डिजिटल क्राप सर्व्हे ॲप हा पायलट प्रोजेक्टर राबविण्यात येत आहे.

# अखिल भारतीय खुल्या कबड्डी स्पर्धेला सुरुवात

### देशभरातून पुरुषांचे २०, महिलांचे १० संघ

## देशभरातून पुरुषांचे २०, महिलांचे १० संघ सहभागी

**दि.१५विदर्भ प्रजासत्ताक अकोला –** अखिल भारतीय खुल्या कबड्डी स्पर्धेचे उद्घाटन हनुमान क्रीडा संकुल येथे गुरुवार, दि.१४ डिसेंबर रोजी मोठ्या उत्साहात संपन्न झाले. यावेळी उद्घाटन सामना खेळविण्यात आला. या स्पर्धेत देशातील पुरुषांचे २० व महिलांचे १० संघ सहभागी झाले आहेत.

हनुमान क्रीडा प्रसारक व बहुउद्देशीय मंडळाच्या वतीने डॉ. राजकुमार बुले यांच्या सन्मानार्थ, स्व. रामकृष्ण अप्पा मिटकरी चषकाचे आयोजन केळीवेळी येथे करण्यात आले आहे. कार्यक्रमाचे अध्यक्ष उद्योजक एकनाथ दुधे, तर पुरुष गटाच्या सामन्याचे उद्घाटन डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाचे कुलसचिव सुधीर राठोड, तर महिला गटाच्या सामन्याचे उद्घाटन गोदावरी मिटकरी यांनी केले.



प्रमुख अतिथी म्हणून हभप सोपान शेलार, डॉ. श्रीकांत काळे, कविता मिटकरी, राष्ट्रीय कबड्डीपटू प्रवीणा गोणे, दहीहंडा ठाणेदार वाघमारे, नाजूकराव पखाले, प्रा. विवेक हिवरे, वासुदेव नेरकर, डॉ. अशोक मोंढे, रामभाऊ अहिर आदी उपस्थित होते. उद्घाटन सामना पुरुष गटात हनुमान क्रीडा मंडळ, केळीवेळी विरुद्ध समता क्रीडा मंडळ, नाशिक आणि महिला गटात अकोला जिल्हा संघ, अकोला विरुद्ध एसएस अक्ॅडमी, दिल्ली यांच्यात झाला. या कबड्डी स्पर्धा मॅटवर खेळविण्यात येत आहेत.

### या स्पर्धेकरिता आलेले पंच

स्पर्धा निरीक्षक वासुदेव नेरकर, आंतरराष्ट्रीय पंच पद्माकर देशमुख, पंच अधिकारी ऋषिकेश कोकाटे, राहुल यादव, प्रशांत रोडे, रवी रोहनकार, चरण शिरसाट, विजय सोनकर, हरीश हरणे, राम नवघरे, दिनेश चंदेल, बिपिन हटकर, वसंत उडाले, देवी कांबळी, महेंद्र डेंगे, रवी नारनवरे, नरेंद्र उमरेकर, शैलेश देशमुख, सय्यद मकसूद, विकास नवघरे, संजय खातोकार, रवी राठोड, सुरेश कालसर्पे, सुधाकर कोहालकर, गौरव धानोरकर, वानखडे, शुभम लुंगे, शोभा सहारे, हे काम पाहणार आहेत.

# ‘अँटी नार्कोटिक्स टास्क फोर्स’ स्थापन होणार

## देवेंद्र फडणवीस यांची विधानसभेत घोषणा

**दि.१५विदर्भ प्रजासत्ताक नागपूर :** ३महाराष्ट्रात आतापर्यंत १ हजार कोटी रूपयांचे (ड्रग्ज) अमली पदार्थ जप्त करण्यात आले आहेत. परिस्थिती पाहता आता ड्रग्जचा पुरवठा करणाऱ्या 'पेडलर'ला पकडून प्रकरण बंद होणार नाही, तर त्याचा मुख्य स्रोतापर्यंत पोहोचावे लागेल, अशा सूचना पोलिसांना देण्यात आल्या आहेत. यासोबतच अंमली पदार्थांवर नियंत्रण ठेवण्यासाठी ‘अँटी नार्कोटिक्स टास्क फोर्स’ स्थापन करण्याचा निर्णयही घेण्यात आला आहे, अशी माहिती उपमुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शुक्रवारी विधानसभेत दिली.

शुक्रवारी विधानसभेत प्रश्नोत्तराच्या तासात रोहित पवार व इतरांच्या प्रश्नावर ते बोलत होते. फडणवीस म्हणाले, ड्रग्ज रोखण्यासाठी प्रत्येक पोलिस ठाण्यात टास्क फोर्स तयार करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले. अमली पदार्थांच्या विरोधात सामूहिक लढा उभारावा लागेल. ते म्हणाले की, बंद कारखान्यांमध्ये रसायनांचा वापर करून ड्रग्ज तयार केले जात असल्याची माहिती मिळाली आहे. यावर नियंत्रण ठेवण्यासाठी आता रासायनिक निर्यातीवर लक्ष ठेवले जाणार आहे. टास्क फोर्सच्या माध्यमातून प्रत्येक जिल्ह्यात अंमली पदार्थांवर नियंत्रण ठेवण्यासाठी प्रयत्न केले जाणार असल्याचे त्यांनी सांगितले.

प्रत्येक जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली अंमली पदार्थ विरोधी समिती स्थापन करण्यात आली आहे. केंद्र सरकार अमली पदार्थ नियंत्रणासाठी कायदे अधिक कडक करत आहे. आवश्यक असल्यास, राज्य स्वतःचा कायदा देखील करेल. कुरिअरद्वारे औषधांचा पुरवठा होत असल्याच्या तक्रारींवरून अशा कंपन्यांना मार्गदर्शक सूचना देण्यात आल्या आहेत. पोलिसांना संशयास्पद कुरिअरची चौकशी करण्यासही सांगण्यात आले आहे. अस्लम शेख, देवयानी फरांदे यांनीही चर्चेत भाग घेतला



### व्यसनमुक्ती केंद्र

फडणवीस म्हणाले की, व्यसनाधीन व्यक्तींसाठी राज्यात व्यसनमुक्ती केंद्रे स्थापन करण्यात येणार आहेत. या संदर्भात, अशी केंद्रे चालवणाऱ्या संस्थांशी चर्चा केली जाईल. मुंबई आणि पुण्यात पीपीपी तत्त्वावर अशी केंद्रे सुरू

# सर्व महानगरपालिका हद्दीतील मालमत्तांचे सर्वेक्षण करणार

### – उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**दि.१५विदर्भ प्रजासत्ताक नागपूर,** – पुण्यातील स्पार्कल कँडल तयार करण्याच्या कारखान्यात झालेल्या स्फोटाच्या पार्श्वभूमीवर पिंपरी-चिंचवड, पुणे महानगरपालिका या ठिकाणच्या ७५ हजार औद्योगिक मालमत्तांचे सर्वेक्षण करण्याचे काम सुरू केले असून राज्यातील इतरही महानगरपालिकांमध्ये टप्प्याटप्प्याने सर्वेक्षण करण्याचे काम करण्यात येणार असल्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानपरिषदेत सांगितले.

नियम ९७ अन्वये अल्पकालीन चर्चा श्रीमती उमा खापरे यांनी उपस्थित केली होती. यावेळी सर्वश्री सचिन अहिर, भाई जगताप यांनी सहभाग घेतला होता. यावेळी श्री. फडणवीस बोलत होते.

उपमुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले की, पुणे जिल्ह्यातील तळवडे येथील मे. राणा इंजिनियरिंग, ज्योतिबा नगर येथे स्पार्कल कॅन्डल तयार करण्याच्या कारखान्यात ८ डिसेंबर, २०२३ रोजी स्फोट होऊन एकूण ११ कामगार मृत्यूमुखी पडले असून या मध्ये ६ महिला कामगारांचा समावेश आहे. १० कामगार जखमी झाले होते. या घटनेच्या ठिकाणी लोकप्रतिनिधींनी पाहणी केली. ज्याठिकाणी दुर्घटना घडली तेथे कच्चे बांधकाम असलेल्या इमारती व एक शटर असलेल्या शेडमध्ये औद्योगिक कारखाना सुरु असल्याचे निदर्शनास आले. या कारखान्यात शोभेच्या दारुपासून वाढदिवसाकरीता वापरण्यात येणारे स्पार्कल कॅन्डल तयार करण्याचे काम सुरु होते. या ठिकाणी व्यवसाय मालकाव्दारे नियुक्त महिला कामगार काम करीत होत्या. हा व्यवसाय अवैध असून परवानगी घेतलेली नव्हती. ही जागा रेड झोनमध्ये समाविष्ट असून तळवडे परिसरात साधारणपणे ३००० विविध प्रकारच्या आस्थापना कार्यरत आहेत. या ठिकाणी कोणत्याही उपाययोजना न केल्याने ही घटना घडली. दुर्घटनेच्या अनुषंगाने पिंपरी-चिंचवड पोलीसांनी कंपनीवर गुन्हा दाखल केला आहे. संबंधित आरोपींना अटक करण्यात आली आहे. कंपनीवर कामगार कायद्याअंतर्गत कारवाई करण्यात येत आहे. ज्या ठिकाणी नियमाचे उल्लंघन झाले आहे त्या संदर्भात कारवाई करण्यात आली आहे, असेही त्यांनी यावेळी सांगितले.

अपघात झालेल्या ठिकाणी सर्वेक्षणाचे काम हाती घेण्यात आले आहे. धोकादायक उद्योगांवर निर्बंध टाकण्याचे काम करण्यात येणार असल्याचेही त्यांनी सांगितले. तसेच अशा धोकादायक ठिकाणी सीसीटीव्ही बसविण्यात येत असून येऊन कंपनींच्या आत व परीसरातील अवैध कामांवर निर्बंध घालण्यात येईल असेही उपमुख्यमंत्री म्हणाले.

# पूर्णामाय निर्माल्य संकलन अभियानातील हरीत सैनिकांचा तहसीलदारांनी केला सन्मान!

**दि.१६विदर्भ प्रजासत्ताक चांदुर बाजार –** तालुक्यातील दरवर्षी क्षात्रवीर संभाजी क्रीडा व युवक प्रतिष्ठान, माणुसकी फाउंडेशन, राष्ट्रीय हरीत सेना ,शंकर विद्यालय तळवेल यांच्या संयुक्त विद्यमाने पूर्णामाय निर्माल्य संकलन अभियानाचे आयोजन करण्यात येते.गणेश विसर्जन वेळी गोळा होणारे निर्माल्य एकत्रित करून त्याचे खत करुन याचा उपयोग झाडांसाठी केला जातो. सामाजिक वनीकरण विभागाच्या सहकार्याने हा उपक्रम राबविला जातो. त्याचप्रमाणे महसूल विभागाकडून हि अभियानाची सहकार्य करण्यात येते. या उत्कृष्ट कार्याची दखल म्हणून सर्वांचा सत्कार करण्यात आला या अभियानात सहभागी शंकर विद्यालयच्या सर्व विद्यार्थी व कार्यकर्ते यांचा सन्मान करण्याचा मनोदय तहसीलदार गीतांजली गरड मॅडम यांनी व्यक्त केला.त्यामूळे



या सन्मान कार्यक्रमाचे आयोजन तहसीलदार यांच्या मार्गदर्शनाखाली तहसील मध्ये करण्यात आले होतेयावेळी या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी तहसीलदार गीतांजली गरड होत्या. प्रमूख उपस्थिती म्हणुन सहायक वनपरिक्षेत्र अधिकारी अशोक कथे, वऱ्हेकर ,जेष्ठ पत्रकार मदन भाटे या अभियानाचे संयोजक डॉ तुषार देशमुख, आयोजन सदस्य प्रज्वल ठाकरे, श्रेयस बर्वे आदी प्रामुख्याने उपस्थित होते. यावेळी अभियानाची प्रसिध्दी करून जनमत बनवल्या बद्दल पत्रकार सागर सवळे,पत्रकार सुयोग गोरले यांचा तसेच अभियानाचा सहकार्य केल्या बद्दल निलेश पळसपगार, प्रज्वल ठाकरे, श्रेयस बर्वे, प्रतीक देशमुख, सदाशिव देवताळे यांचा ही सन्मान गौरवपत्र व सन्मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी या अभियानाचे संयोजक डॉ तुषार देशमुख यांचाही सन्मान तहसीलदार गीतांजली गरड यांनी स्वतः केला. या अभियानाचे त्यांनी भरभरुन कौतुक केले. कार्यक्रमाला शंकर विद्यालयाचे हरीत सेनेचे विद्यार्थी, पत्रकार व पालक मंडळी उपस्थीत होते.

# मातृवंदन योजनेचा लाभ घेतला का? १८ डिसेंबर पासून विशेष मोहीम

**दि१६विदर्भ प्रजासत्ताक**
**अमरावती**

प्रधानमंत्री मातृवंदन योजना विशेष मोहीम १८ ते २२ डिसेंबर या कालावधीत राबविण्यात येत आहे. या मोहिमेचा लाभ घेण्याचे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे.

भारतातील दारिद्र्यरेषेखालील व दारिद्र्यरेषेवरील अनेक गर्भवती महिलांना गरोदरपणात शेवटच्या टप्प्यापर्यंत मजुरीसाठी काम करावे लागते. तसेच प्रसूतीनंतर शारीरिक = क्षमता नसतानाही मजुरीसाठी तात्काळ काम करावे लागते. यामुळे अशा ( गर्भवती महिला व माता कुपोषित राहून त्याचे व त्याच्या नवजात बालकाच्या वि आरोग्यावर विपरीत परिणाम होतो.यामुळे देशाच्या मातामृत्यू व बालमृत्यू दरात वाढ होते. या कारणामुळे मातामृत्यू व बालमृत्यू कमी करण्यासाठी आरोग्य विभागामार्फत केंद्रशासनाच्या प्रधानमंत्री मातृवंदन योजनेला चांगला प्रतिसाद मिळत आहे. यामध्ये पहिल्या जीवित अपत्या मुलगा/मुलगी) करिता पाच हजार रुपयांचा लाभ लाभार्थीला दोन टप्प्यांत दिला जातो. यामध्ये दुसरे जीवित अपत्ये फक्त मुलीसाठी एकाच टप्प्यात सहा हजार रुपयांचा लाभ लाभार्थीला दिला जात आहे. मात्र याकरिता बाळाचा जन्म १ एप्रिल २०२२ नंतरचे असायला पाहिजे.

या योजनेचा लाभ घेण्याकरिता आ इपल्या जवळच्या आशा कार्यकर्ती, अंगणवाडी सेविका तसेच आरोग्यसेविका यांच्याशी संपर्क करून आपले प्रधानमंत्री मातृवंदन योजनेअंतर्गत ऑनलाइन फार्म भरून नोंदणी करावी. जिल्ह्यातील सर्व पात्र गरोदर माता प्रधानमंत्री मातृवंदन योजनेपासून वंचित राहू नये. यासाठी सर्व आरोग्य यंत्रणा प्रयत्नशील राहतील असे, आवाहन जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर व जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी समीर कुर्तकोटी यांनी केले आहे.

### योजनेचा लाभ घेण्याकरिता पात्रता

लाभार्थींचे कौटुंबिक उत्पन्न प्रतिवर्ष रुपये ८ लाखांपेक्षा कमी पाहिजे. अनुसूचित जाती/जमातीच्या महिला. दरिद्रयरेषेखालील शिधापत्रिकाधारक महिला. ई-श्रम कार्डधारक महिला. मनरेगा जॉब कार्डधारक महिला. दिव्यांग महिला ४० टक्के किंवा पूर्ण दिव्यांग. किसान सन्मान निधी महिला शेतकरी. अन्न सुरक्षा कायदा २०१३ अंतर्गत शिधापत्रिकाधारक महिला. प्रधानमंत्री जन आरोग्य योजना कार्डधारक महिला.

# लसणाचे दर स्थिर: भाजीपाल्याची आवक वाढली कांद्याची फोडणी स्वस्त, वांग्याचे भरीत महाग

**दि.१६ विदर्भ प्रजासत्ताक**
**अमरावती**



आठवडाभरापूर्वी ८०रुपयांपर्यंत गेलेले कांद्याचे दर १५ डिसेंबरला अमरावती च्या बाजारात ३० रुपयांपर्यंत गडगडले. मात्र, वांग्याचे दर दुप्पट झाले आहेत. ३० रुपयांवरून वांगे ६० रुपये किलोपर्यंत महागले असून, भरिताची चव आता सामान्यांच्या खिशाला झळ पोहोचवणारी ठरत आहे. लसणाचे दर मात्र स्थिर आहेत.

कांदा, लसणाशिवाय स्वयंपाक होत नाही. भाजीला फोडणीसाठी आवश्यक असलेल्या लसणासह कांद्याचे दर मागील आठवड्यात वाढले होते. याआठवड्यात कांद्याची२आवक वाढल्याने दरं निम्म्यापेक्षा कमी झाले. ८० रुपये किलोपर्यंत पोहोचलेल्या कांद्याचे दर डिसेंबरला येथील बाजारात ३० रुपये किलोपर्यंत खाली आले.

१५ डिसेंबर ला बाजारात ३०रुपये पर्यंत खाली आले दुसरीकडे वांग्याचे दर मात्र कडाडले आहेत. त्यामुळे वांगे सामान्यांच्या आवाक्याबाहेर गेले आहेत. इतर भाजीपाल्यांचे दर स्थिर असून लसणाचे दर ३२० रुपयांवर स्थिरआहेत.दहा दिवसांपूर्वी अवकाळी पाऊस झाला, त्यामुळे भाजीपाला पिकांना फटका बसला होता. तोडणीला आलेला भाजीपाला तातडीने बाजारात विक्रीसाठी नेण्याची शेतकऱ्यांची लगबग दिसून येत आहे.




# मेळघाट पुन्हा प्रधानमंत्री ग्राम सडक योजना मधे धारणी टु अमरावती जिल्हा पर्यंत स्वादिष्ट भोग भ्रष्टाचार

## कार्यकारी अभियंता म्हणतात ऑल ईज वेल

**दि.१६विदर्भ प्रजासत्ताक**
**धारणी**

धारणी तालुक्यातील बाबई ढाना,लाकटु बिबामल, रोड चे हाल बेहाल ज्या प्रमाणे मेळघाटात वेळेच्या आधीच जन्मलेल्या मुलांना कुपोषण श्रेणीत टाकले जाते त्याच आधारावर मुख्यमंत्री ग्राम सडक योजना संपूर्ण फेल झाली असून रोड चा जन्म होताच सात महिन्यात च हा संपूर्ण रोड कुपोषण श्रेणीत गेला आहे साडे सहा करोड रुपयांची बिले डकारल्या बरोबर सातच महीण्यात बाबळी नाला ते बंबई ढाणा पर्यंत संपूर्ण रोड चा धिंगाणा झाला आहे एवढेच नव्हे तर या रोड वर कोणत्याही प्रकारची जड वाहतूक नसुन फक्त जनरल वाहतूक शुरु असतांनाही या रोड चे तीन तेरा वाजले आहेत कारण की अमरावती जिल्हा ऐथुन महाभारतातील संजय द्रुष्टी या अधिकारीना प्राप्त असल्याने संपूर्ण मेळघाटातील कामे हे ऑल ईज वेल सांगुन शासनाची व मुख्यमंत्री यांची दीशा भुल केली जात आहे आता या रोड ला घेऊन मेळघाटातील काही सुज्ञ नागरिक थेट मुख्यमंत्री यांची भेट घेऊन तक्रार देण्याच्या तयारीत आहेव तक्रार दिल्यानंतर सुद्धा जर ठेकेदार ला ब्लेक लिष्ट केले नाही तर ऐणार्या लोकसभा निवडणुकीत बहिष्कार केल्या शिवाय राहणार नाही असे सुद्धा बोलले जात आहे.

# हिवाळी अधिवेशनातून उद्योग, रोजगार मिळेल का? जिल्हावासीयांच्या अपेक्षा

**दि.१६विदर्भ प्रजासत्ताक**
**अमरावती**



विदर्भाला न्याय देण्याकरिता दरवर्षी नागपुरात हिवाळी अधिवेशन आयोजित केले जाते. परंतु या अधिवेशानातून विदर्भाला लाभ होतो काय, या अधिवेशातून येथील शेतकरी समस्या, बेरोजगारांना रोजगार आणि नवीन उद्योग येतील का, अशी अपेक्षा आता नागरिकांना लागली आहे.

विदर्भातच सद्या शेतकर्यांची मोठी बिकट अवस्था झाली आहे. खरिपानंतर अवकाळी पावसामुळे रब्बीलाही फटका बसला आहे. अशातही सोयाबीन, कापूस, तूर या उत्पादणाला भाव नाही, जिल्ह्यात तूर, कापूस, चणा, गेहू, संत्रा, मोसबी उत्पादन शेतकर्यांचे अवकाळी पावसामुळे नुकसान झाले. विदर्भात पूर्णतः दुष्काळजन्य परिस्थिती निर्माण असून अवकाळी पावसामुळे अनेक शेतकर्यांचे हातात आलेले पिके निघून गेले आहे. त्यांच्या हितावर अधिवेशनात साधी चर्चा नाही.ती चर्चाशेवटपर्यंत होईल का, असा प्रश्न उपस्थित केल्या जात आहे. विदर्भात बेरोजगारी, शिक्षण, नवीन उद्योग केव्हा येईल व विदर्भासाठी कुठल्या योजना अधिवेशनात आखल्या जातील. पोलिस सेवा, आरोग्य सेवा, सरकारी सेवा या अधिवेशनामुळे प्रभावित होतात. परंतु पाहीजे प्रमाणात विदर्भाला लाभ होत नसल्याची खंत नागरिकांकडून व्यक्त होत आहे. पिकविम्याच्या बाबतीतही शासन गंभीर नसल्याचा आरोप होत आहे. त्यामुळे या अधिवेशनात विदर्भातील समस्यांचे समाधान करावे, अशी मागणी होत आहे.

# अप्पर वर्धा वसाहतीमधील अनधिकृत विजेचे वायर जप्त

## मोर्शीच्या वीज वितरण विभागाची कारवाई

**दि.१६विदर्भ प्रजासत्ताक**
**मोर्शी**



मोर्शी शहराच्या मध्यवर्ती भागात असणार्या अप्पर वर्धा वसाहतीमधील अनेक घरात कर्मचारी रहात आहे, त्यामधील काही घरात नागरिक अनधिकृत पध्दतीने राहतात ते नागरिक रात्रीच्या वेळेस गाळमधील बावर टाकून बीज घेतात, याची माहिती मिळताच मोसों बेचील बीज वितरण कंपनीचे अभियंता सतीश देऊळकर यांच्या पथकाने वसाहतीची पाहणी करून संशयास्पद असलेले व बंद स्थितीत आढळलेले पाया जप्त केले. मोर्शी शहरामध्ये अप्पर वर्धा धरणावर कामकाज करणारे अधिकारी व कर्मचार्यांना राहण्याकरीताअप्पर वर्धा वसाहत बांधलेली आहे. परंतु यामधील बरेचसे कर्मचारी सेवानिवृत्त किंवा बदली झाल्याने या वसाहतीमधून निघून गेले आहे. त्यामुळे या वसाहतीमध्ये इतर शासकीय कार्यालयातील कर्मचारी भाडेतत्वावर राहत आहे त्याचबरोबर या वसाहती मधील अनेक परे रिक्त असल्याने काही नागरिक तेथे अनधिकृतपणे अधिकारी सुद्धा राहतात.अनधिकृत पणे राहणारे काही नागरिक रात्रीला चोरून वीजवसाहतीमधील ३० ते ४० पराधी तासणी करून तीन बंदल वायर जप्त करण्यात आले.

घेत असल्याचे समजताच मोर्शी शहरातील वीज वितरत कंपनीचे अभियंता सतीस देऊळकर यांनी आपल्या अधिनस्त कर्मचा-याकडून अपर वसाहतीमध्ये असलेल्या घराची पाहणी केली या वेळी काही घरांमध्ये मीटर नसूनसुद्धा त्या घरातून बाहेर वायर दिसून आले.वसाहतीमधील ३० ते ४० घराची तपासणी करून तीन बंडल वायर जप्त करण्यात आले.

या मोहिम्मुळे अनधिकृत वीज घेणार्यांचे धाबे दणाणले असून ही कार्यवाही वीज वितरण कंमनीचे कार्यकारी अभियंता प्रशांत काकडे यांच्या मार्गदर्शनाखाली व कनिष्ठ अभियंता सतीश देऊळकर यांच्या नेतृत्वात वंजारी, ईखे, उमाळे, रोशन राऊत, घोंटे, वर्मा उदापुरे यांनी केली.

# महापालिका कर्मच्याऱ्यांचा संप तिसऱ्या दिवशीही सुरू

**दि.१६विदर्भ प्रजासत्ताक**
**अमरावती**

राज्य शासनाचे सर्वकर्मचारी कामावर परतले असले, तरी महापालिका कर्मचार्यांचा संप मात्र अद्याप कायम आहे. आज, दुसर्या दिवशीही कर्मचारी संपावर ठाम असल्याने संपूर्ण कामकाज ठप्प झाले होते.

सातव्या वेतना आयोगाच्या थकबाकीच्या मुख्य मागणीसह इतरही प्रलंबित मागण्यांसाठी महापालिकेच्या कर्मचार्यांनी गुरुवारपासून बेमुदत संप पुकारला आहे. आयुक्त देविदास पवार यांच्याशी शुक्रवारी कोणतीही चर्चा होऊ न शकल्याने कर्मचार्यांच्या मागण्यांबाबत कोणताही तोडगा निघू शकला नाही. त्यामुळे सर्व अधिकारी वकर्मचार्यांनी कामबंदचा पवित्रा कायम ठेवला. परिणामी, मुख्य कार्यालयासह पाचही झोनमध्ये जवळपास शुकशुकाट पाहायला मिळाला.



कर्मचार्यांनी मुख्य कार्यालयाच्या प्रवेशद्वारासमोर दिवसभर ठिय्या दिला. या संपामुळे मुख्य कार्यालयात प्रामुख्याने जन्म व मृत्यू दाखल्यासाठी येणारे नागरिक निराश होऊन परत जात असल्याचे चित्र पाहायला मिळाले.

दरम्यान, राज्य शासनाने जुनी पेन्शनच्या मागणीबाबत सकारात्मक प्रतिसाद दिल्याने शासकीय व निमशासकीय कर्मचारी, आरोग्य यंत्रणेतील सर्व कर्मचारी कामावर रूजू झाले आहे. त्यामुळे संबंधित कार्यालयात, सरकारी रुग्णालयांत जाणार्या नागरिकांची गैरसोय टळली आहे.

# शिवसेना जिल्हाप्रमुख गोपाल पाटील अरबट यांच्या नेतृत्वाखाली पोलीस पाटलांचे मंत्री ना.उदय सामंत यांना निवेदन

**दि.१६विदर्भ प्रजासत्ताक**
**अमरावती**



नागपूर येथे महाराष्ट्र राज्याचे उद्योग मंत्री ना उदय सामंत यांच्या शासकीय निवास येथे शिवसेना जिल्हाप्रमुख गोपाल पाटील अरबट यांच्या नेतृत्वात महाराष्ट्र राज्य पोलीस पाटील (असो.)चे अमरावती जिल्ह्यामधील पोलीस पाटील(असो.) संघटनेच्या पोलीस पाटील पदाधिकार्यांनी महाराष्ट्र राज्याचे उद्योग मंत्री ना. उदय सामंत साहेब यांना पोलीस पाटील यांच्या समस्याचे निवेदन देउन सर्व अमरावती जिल्ह्यातील पोलीस पाटील संघटनेच्या पदाधिकारी सोबत सविस्तर चर्चा करुन मागण्या मान्य करण्यासाठी तात्काळ महाराष्ट्राचे मुख्यमंत्री ना एकनाथ शिंदे यांच्या सोबत चर्चा करून महाराष्ट्रातील सर्व पोलीस पाटलांना न्याय मिळवून देवु हे पोलीस पाटील संघटनेला आश्वासन दिले त्यावेळी अमरावती पोलीस पाटील (असो.) संघटनेच्या जिल्हा संघटक सौ अश्विनी अरबट,सौ रुशाली घोगरे, सौ वैशाली शेळके इत्यादी उपस्थित होते.

# ओबीसी घरकुल योजनेतील जाचक अटी शिथिल करा : सरपंच सेवा महासंघ महाराष्ट्र राज्य तर्फे मागणी

**दि.१६ विदर्भ प्रजासत्ताक**
**अंजनगांव सुर्जी**

पंतप्रधान नरेंद्र मोदी घरकुल योजना ही गरजवंतांना घरकुल विभागातर्फे प्रत्येक ग्रामपंचायतला देण्यात आलेले आहे. परंतु त्यामध्ये ओबीसींचे काष्ट सर्टिफिकेट आणि डोमेशियल मागण्यात येत आहेयामध्ये ग्रामीण भागातील मजुर घरकुलधारकांना फार मोठा प्रश्न निर्माण झालेला आहे कारण त्यांच्या वडिलांकडे आजोबा पंजोबाकडे काष्ट सर्टिफिकेट नव्हते आणि ते काढायचे असल्यास त्यामध्ये फार किचकट बाबी असल्यामुळे कास्ट सर्टिफिकेट आणी डोमेशियल काढणे फार अवघड जात आहे .हा फार मोठा पेच घरकुल धारक यांना पडलेला आहेगरजवंतांना घरकुल तर द्यायचे परंतु त्यामध्ये इतक्या जाचक अटी घातल्या की ते घरकुल धारक सहज घेऊ शकत नाहीत कारण एखादा गरीब मजूर जर असला तर तो तहसील मध्ये चकरा मारू शकत नाही आणि त्या दीड लाखाच्या घरकुल साठी तो कागदपत्रे जमा करून हतबल होऊन जातो शेवटी म्हणतो की जाऊ दे ते घरकुल माझी कुळाची झोपडीच बरी आहे . असा प्रश्न त्यांच्यासमोर निर्माण होतो शासनाला घरकुल द्यायचे आहे पण त्यामध्ये इतक्या अटी घातल्यामुळे हे घरकुल खरे गरजवंत लाभार्थी यांना घेणे



अवघड झाले आहे त्याकरिता यामध्ये डोमेशियल आणि कास्ट सर्टिफिकेट ची अट घातलेली आहे ती अट रद्द करून त्यांच्या मुलाची किंवा नातवाची काष्ट सर्टिफिकेट असेल तर त्या आधारावर घरकुल देण्यात यावे ही मागणी सरपंच सेवा महासंघाचे अध्यक्ष आदर्श ग्राम खिरगव्हाणचे माजी सरपंच पुरुषोत्तम घोगरे यांनी केली आहे. राज्यातील सरपंच तसेच सरपंच सेवा महासंघाचे पदाधिकारी जिल्हाध्यक्ष, तालुकाध्यक्ष यांनी याबाबत पंतप्रधान नरेंद्र मोदी तसेच महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना पत्राद्वारे मागणी केलेली आहे.ज्यांच्याकडे कास्ट सर्टिफिकेट आणि डोमेशियल उपलब्ध नाही परंतु असेलही पण ते कास्ट सर्टिफिकेट डोमेशियल त्यांच्या मुलाचे नातवाचे आहे जे जुने लाभार्थी आहेत त्यांच्याकडे ओबीसी सर्टिफिकेट नसल्यामुळे खरे गरजवंत घरकुलापासून वंचित राहत आहेत. त्यामध्ये जातीच्या सर्टिफिकेटची शिथीलता देण्यात यावी किंवा जर त्या कुटुंबातील कोणाचेही ओबीसीचे सर्टिफिकेट असेल तर ते ग्राह्य धरून त्या गरजवंतांना घरकुल देण्यात यावेही मागणी सर्व राज्यातील सरपंचां कडून होत आहे ही अट शासनाने रद्द करावी अशी मागणी सरपंच सेवा महासंघ संघटने तर्फे करण्यात आलेली आहे ही अट रद्द न झाल्यास सरपंच सेवा महासंघाचे संस्थापक अध्यक्ष पुरुषोत्तम घोगरे यांच्या माध्यमातून संपूर्ण राज्यभर पंचायत समितीच्या समोर धरणे आंदोलन करण्यात येणार असल्याचे सांगीतले आहे.

# श्री शिव पार्वती शिवमहापुराण कथा पूज्य पंडित प्रदीप जी मिश्रा (सीहोर वाले)

# 'श्री शिवाय नमोस्तुभ्यं' मंत्राने कथास्थळी चैतन्य



हनुमान चालिसा चॅरीटेबल ट्रस्टतर्फे आज पासून हनुमानगढी येथे आयोजित शिवमहापुराण कथेला सुरुवात झाली आहे. महाराष्ट्र राज्यासह सह इतर राज्यातील हजारो भाविक शिव कथा पूर्व संध्येस अमरावती शहरात दाखल झाले आहेत. पहिल्याच दिवशी लाखो भक्तांनी या ठिकाणी आपली उपस्थिती दर्शवली. राणा दाम्पत्याने या कथेचा लाभ घेतला आयोजकांच्या वतीने अतिशय उत्कृष्ट व्यवस्था या ठिकाणी करण्यात आली आहे. तर पोलिसांचा तगड़ा बंदोबस्त या ठिकाणी आहे. राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी कथास्थळी भेट देत महाराजांचे आशिर्वाद घेतले.

## पी. आर. पोटे पाटील अभियांत्रिकी महाविद्यालयात तंत्रज्ञानाचा मेळावा

### भारत सरकार द्वारा स्मार्ट हॅक्थॉन २०२३ करिता विदर्भात पहिल्यांदाच पी. आर. पोटे पाटील अभियांत्रिकी महाविद्यालयात होणार : ११ राज्यातील भारत सरकार ने निवडलेले ४८८ विद्यार्थी सहभागी होणार

**दि.१६विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

केंद्रीय शिक्षण मंत्रालयाच्या इनोव्हेशन सेल (चखउ) आणि ऑल इंडिया कौन्सिल फॉर टेक्निकल एज्युकेशन (AICTE) द्वारे स्मार्ट इंडिया हॅकाथॉनचे २०२३ चे आयोजन येत्या १९ व २० डिसेंबर ला करण्यात येणार आहे. भारत सरकार , केंद्रीय शिक्षण मंत्रालय व ऑल इंडिया कौन्सिल फॉर टेक्निकल एज्युकेशन द्वारा देशामधील विविध राज्यातील ४७ गुणवत्ता प्राप्त महाविद्यालयाची सर्व निकषाची पडताळणी करून निवड करण्यात आली असून विदर्भात एकमेव अमरावती येथील पी. आर. पोटे पाटील अभियांत्रिकी व व्यवस्थापन महाविघालयाची निवड भारत सरकार व AICTE च्या वतीने करण्यात आली आहे. विदर्भात पहिल्यांदाच पंतप्रधान माननीय नरेंद्रजी मोदी यांच्या संकल्पनेतून उदयास आलेल्या तसेच केंद्रीय मंत्रालय व -खउढए द्वारा आयोजित स्मार्ट इंडिया हॅकाथॉनचे आयोजन होणार असून पी. आर. पोटे पाटील महाविद्यालयाच्या भव्य स्वामी विवेकानंद ऑडिटोरिअम मध्ये दिनांक १९ व २० डिसेंबर ला हि स्पर्धा पार पडणार आहे. पी. आर. पोटे पाटील अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या कॅम्पस मध्ये तामिळनाडू , आंध्रप्रदेश, छत्तीसगड, पश्चिम बंगाल, तेलंगणा, त्रिपुरा, हरियाणा, पंजाब, मध्यप्रदेश, उत्तरप्रदेश, दिल्ली येथील IIT, IIM , NIT तील ४८८ विद्यार्थी सहभाग घेणार आहे व पर्यावरण, वन आणि हवामान बदल केंद्रीय मंत्रालयाद्वारे प्रदान केलेल्या पाच समस्यांचे निराकरण करण्यासाठी व समस्येवर तोडगा काढण्याकरिता सहभागी विद्यार्थी सतत ३६ तास कार्य करणार आहे.



भारत सरकार द्वारा नाविन्य आणि समाजात उद्भवत असलेल्या समस्या सोडवण्याला चालना देणारा हा उपक्रम असून पी. आर. पोटे पाटील अभियांत्रिकी महाविद्यलयाच्या उच्चतम गुणवत्तेमुळे तसेच महाराष्ट्रात नॅक अ ++ मानांकन प्राप्त असल्यामुळे या स्पर्धेच्या आयोजनाकरिता निवड झाली असल्याने हि अमरावतीकरांकरिता कौतुकास्पद व अभिमानाची बाब असून राष्ट्रीय पातळीवर अमरावतीचे नावलौकिक यामुळे वाढणार आहे. या स्पर्धेचे उद्घाटन १९ डिसेंबर २०२३ जी सकाळी ९ वाजता भारत सरकार , केंद्रीय शिक्षण मंत्रालयाच्या हस्ते व विशेष मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न होणार आहे. तसेच समारोप २० डिसेंबर २०२३ ला रात्री ८:३० ला होणार आह त्याचप्रमाणे शिक्षण मंत्रालयाच्या इनोव्हेशन सेलने स्पर्धे करीता महाविद्यालयात इंडस्ट्रीचे सीईओ,संचालक, नामवंत सायंटिस्ट परीक्षक येणार आहेत

स्मार्ट इंडिया हॅकाथॉन केंद्रीय शिक्षण मंत्रालयाच्या इनोव्हेशन सेलने विद्यार्थ्यांना राष्ट्रीय स्तरावरील व्यासपीठ उपलब्ध करून दिले आहे. जेणेकरून विद्यार्थ्यांना केंद्र सरकार मंत्रालय, विभाग उद्योग आणि इतर संस्थांना भेडसावणाऱ्या समस्यावर या व्यासपीठाद्वारे उपाय शोधता येतील. स्मार्ट इंडिया हॅकाथॉन हे जगातील एकमेव सर्वात मोठे ओपन इनोव्हेशन मॉडल आहे. ज्यामध्ये विद्यार्थ्यामध्ये समस्या सोडवण्याची संस्कृती रुजवली जाते. SIH सॉफ्टवेअर आणि SIH हार्डवेअर या दोन स्वरुपात उच्च शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांसाठी २०१७ पासून दरवर्षी या स्पर्धेचे आयोजन केले जाते. संपूर्ण स्पर्धे चे आयोजन महाविद्यालयातील विद्यार्थी करणार असून यामध्ये कोडिंग क्लब , फोटोग्राफी क्लब, कल्चरल क्लब , कम्युनिकेशन क्लब चे विद्यार्थी यांचा सहभाग आहे. या पत्रकार परिषदेला पी. आर. पोटे पाटील एज्युकेशनल ग्रुप चे उपाध्यक्ष श्रेयशदादा पोटे पाटील, संचालक डॉ. डी . टी . इंगोले, हॅक्थॉन संयोजक डॉ झिशान खान , डॉ मो. झुहेर सर्व महाविद्यालयाचे डीन , विभागप्रमुख उपस्थित होते.

## शिष्यवृत्तीसाठी ओबीसी महिलाही सरसावल्या

**दि.१६ विदर्भ प्रजासत्ताक भंडारा**

ओबीसींच्या विविध मागण्यांसाठी ओबीसी महिला सेवा संघही सरसावला आहे. ओबीसी विद्यार्थ्यांना १०० टक्के शिष्यवृत्ती मंजूर करण्यात यावी, जातनिहाय जनगणना तसेच अन्य मागण्यांसाठी ओबीसी महिला सेवा संघाने ५ हजार पोस्ट कार्ड मुख्यमंत्र्यांना पाठविले आहे. शुक्रवारला पोस्ट कार्ड पोस्ट मास्टर भोयर यांच्याकडे सुपूर्द केले. बिहार राज्याच्या धर्तीवर महाराष्ट्र राज्यांतही जातीनिहाय जनगणना करावी, मराठा समाजाला ओबीसीत समाविष्ट करण्यात येऊ नये, शिंदे समिती बरखास्त करण्यात यावी, ओबीसी विद्यार्थ्यांना १०० टक्के शिष्यवृत्ती मंजूर करावी, ओबीसींचे मंजूर ७२ वसतिगृह वेळेत सुरू करावे, आदी मागण्या पोस्ट कार्डमध्ये समाविष्ट आहेत.पोस्ट मास्तर भोयर यांच्याकडे पोस्ट कार्ड देतेवेळी ओबीसी सेवा संघाच्या महिला राज्याध्यक्ष मंगला वाढीभस्मे, महिला जिल्हाध्यक्ष प्रमिला डोरले, कार्याध्यक्ष ललिता देशमुख उपस्थित होते.

## विधानभवन प्रवेशपत्रासाठी दिली खोटी माहिती तथाकथित महिला पत्रकार, साथीदारावर गुन्हा दाखल

**दि.१६विदर्भ प्रजासत्ताक नागपूर**



विधानसभेच्या डायरीत नाव नोंदविण्यासाठी खोटी माहिती देणारी तथाकथित महिला पत्रकार आणि तिच्या साथीदाराविरुद्ध फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर पोलिस ठाण्यात हा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सरिता कुलकर्णी व नरेंद्र वैरागडे अशी आरोपींची नावे आहेत. हिवाळी अधिवेशनात माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाकडून विधिमंडळातील दूरध्वनी व व्यवस्थेसंदर्भातील डायरी प्रकाशित केली जाते. यात नेते, अधिकाऱ्यांसोबत प्रमुख वर्तमानपत्रे व वृत्तवाहिन्यांच्या पत्रकारांसह सर्वांची नावे, पदे आणि क्रमांक नोंदविलेली असतात. सरिता कुलकर्णी यांनी स्वत:ला नेटवर्क-१० चे ब्यूरो चीफ आणि नरेंद्र वैरागडे त्यांचे सहकारी असल्याचे सांगून, डायरीत नाव नोंदविण्यासाठी माहिती विभागाकडे अर्ज केला. त्याआधारे माहिती विभागातर्फे नेटवर्क-१० चे राज्य प्रमुख विनोदकुमार ओझा यांच्याशी संपर्क साधण्यात आला. तसेच कुलकर्णी यांनी सादर केलेले नियुक्तिपत्र त्यांना पाठविले. ओझा यांनी अशा कोणत्याही व्यक्तीची नियुक्ती केल्याचा इन्कार केला. नियुक्तिपत्रावर ओझा यांची बनावट स्वाक्षरी होती. ओझा यांनीही आपली स्वाक्षरी नाकारली.

### विधिमंडळ परिसरात 'तथाकथित' पत्रकारांचा सुळसुळाट

विधिमंडळ परिसरात यंदा तथाकथित पत्रकारांचा सुळसुळाट झाला आहे. वर्षभर पत्रकारितेत कुठेही न दिसणारे, मात्र अधिवेशन काळात अचानक उगवणारे अनेक पत्रकार तयार झाले आहेत. अगदी बोटांवर व्ह्यू असलेल्या कोणत्या तरी स्थानिक यू-ट्यूब चॅनेल किंवा फेसबुक चॅनेलच्या नावावर हे पत्रकार विधिमंडळ सचिवालयाकडे प्रवेशपत्राची मागणी करतात. सचिवालयाकडूनदेखील कोणत्याही पद्धतीची खातरजमा न करता प्रवेशपत्र जारी करण्यात येतात. परिसरात अशी पत्रकारांची संख्या खूप वाढली आहे. एखाद्या नेत्याला अचानक थांबवायचे व मनाला वाटेल तसे 'अर्थपूर्ण' प्रश्न विचारण्यावरच त्यांचा भर असतो. असे करत असताना नियमांचेदेखील पालन होत नाही. यामुळे विधिमंडळ परिसरात सुरक्षारक्षकांचीदेखील डोकेदुखी वाढली आहे.

### गंभीरपणे वार्तांकन करणाऱ्यांना मनस्ताप

विधिमंडळात जनतेच्या हिताच्या मुद्द्यांचे वार्तांकन करण्यासाठी पत्रकार जात असतात. मात्र, सभागृहात हे तथाकथित पत्रकार फिरकतदेखील नाही. त्यांचे पूर्ण लक्ष परिसरातील नेते, त्यांचे सचिव यांच्यावरच असते. अशा तथाकथित पत्रकारांमुळे खरोखरच गंभीरपणे वार्तांकन करायला येणाऱ्या इतर 'डिजिटल' पत्रकारांना नाहक मनस्ताप सहन करावा लागतो. काही जणांनी तर चक्क कुटुंबातील सदस्यांनाच कॅमेरामन किंवा सहकारी असल्याचे दाखवत आणल्याचे चित्र आहे. जर अधिकाऱ्यांनी आक्षेप घेतला तर एखाद्या मोठ्या नेत्याचे नाव सांगत 'त्यांच्याशी बोलावे लागेल' अशी धमकीच देण्यात येते.

## पोलिस ठाणे होणार चकाचक; ६७ भंगार वाहनांच्या मालकांचा शोध



**दि.१६विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

शहरातील सर्वच पोलिस ठाण्यांमध्ये पडून असलेल्या दुचाकी, चारचाकी तथा वाहनांचे भंगार हटवून पोलिस ठाणी चकाचक करण्यासाठी पोलिस आयुक्त नवीनचंद्र रेड्डी यांनी पुढाकार घेतला असून, या वाहनांच्या मूळ मालकांचा शोध घेण्यास पोलिसांनी सुरुवात केली आहे. पोलिस ठाण्यातील ती वाहने मूळ मालकांनी घेऊन जावीत, असे आवाहन करण्यात आले आहे. शहरातील दहाही पोलिस ठाण्यांसह वाहतूक शाखेत देखील त्यापेक्षा अधिक बेवारस वाहने मूळ मालकांच्या प्रतीक्षेत आहेत. नांदगाव पेठ पोलिस ठाण्यातही ५७ दुचाकी व दहा कार बेवारस पडल्या आहेत.

अनेक वर्षांपासून विविध गुन्ह्यांमध्ये, तसेच अपघातांत, बेवारस अशी जमा केलेली वाहने पोलिस ठाण्यांमध्ये वर्षानुवर्षे धूळखात पडून असल्याचे चित्र पाहावयास मिळते. पोलिस ठाण्याच्या इमारतीजवळ अनेकदा या वाहनांचा खच पडलेला असतो. या वाहनांच्या मूळ मालकांचा शोध घेताना पोलिसांची दमछाक होत असल्याने 'भंगार' वाढतच जाते. यामुळे पोलिस ठाणे की जुन्या वाहनांचे गोदाम? असा प्रश्न बघणाऱ्यांनाही पडतो. यामुळे पोलिस ठाण्याच्या सौंदर्यात बाधा येत असते. ही बाब ओळखून पोलिस आयुक्तांनी पुढाकार घेत त्यांनी पोलिस ठाण्यांच्या आवारातील वाहनांची योग्य विल्हेवाट लावण्याचे आदेश दिले आहेत. चोरांच्या ताब्यातून पकडण्यात आलेली तसेच पोलिसांनी जप्त केलेली वाहने त्यांच्या मालकांचा शोध न घेता तशीच पोलिस ठाण्यांमध्ये पडून राहतात. त्याची विल्हेवाट लावण्याची सवड मिळत नसल्याने वर्षानुवर्षे ऊन-पाऊस-वाऱ्यात त्यांची अवस्था भयंकर होती. अनेकदा त्यात डासांची पैदास होऊन पोलिसांनाच मलेरिया, डेंग्यूची लागण झाल्याच्या घटना वारंवार समोर आल्या आहेत. त्याअनुषंगाने शहर पोलिस आयुक्तांनी सकारात्मक पुढाकार घेतला आहे.

**...तर केला जाईल लिलाव**

पोलिस आयुक्तांच्या आदेशानुसार, ठाणेदार प्रवीण काळे यांनी नांदगाव पेठ पोलिस ठाण्यामधील बेवारस वाहनांची शोधमोहीम हाती घेतली आहे. भंगार झालेल्या वाहनांमधील बेवारस वाहनांच्या मूळ मालकांचा शोध घेतला जात आहे. बेवारस वाहनांचे क्रमांक जाहीर करण्यात आले आहेत. ज्या वाहनांचे मूळ मालक मिळून येतील, त्यांची वाहने त्यांच्याकडे सुपूर्द केले जातील. अन्यथा, उर्वरित वाहनांचा लिलाव करून विक्री करण्यात येणार आहे. नांदगाव पेठ ठाण्यातील काही वाहने अपघातग्रस्त, तर काही वाहने इन्शुरन्समध्ये असल्याने मूळ मालकांनी त्याकडे पाठ फिरविली आहे.

काही वाहनांवर बनावट क्रमांक असल्याचे आढळून आले. वाहनांचे चेसिस नंबर आणि इतर माहितीच्या आधारे मूळ वाहनधारकांचा शोध घेतला आहे. आरसी बुक व आधार कार्डच्या माध्यमातून वाहनाची ओळख पटल्यास मालकास वाहन देऊ. ठाण्यात ५७ दुचाकी व १० कार बेवारस आहेत.